बुधवार, २४ जानेवारी २०२४

⦿ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)

⦿ मराठी ⦿ दैनिक

⦿ वर्ष - ०३ ⦿ अंक - १५९

⦿ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 24 JANUARY 2024 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-159 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-05


### चर्चेतली बातमी

## सफाई कामगारांना मराठा सर्वेक्षणाचे काम

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** पालिकेने कर्मचारी, अभियंत्यांबरोबरच सफाई कामगारांनाही मराठा सर्वेक्षणाच्या कामाची जबाबदारी सोपविली असून निरक्षर असलेल्या तमिळ भाषिक सफाई कामगारांची या कामासाठी नियुक्ती होताच अनेकांना आश्चर्याचा धक्का बसला आहे. त्यामुळे सर्वेक्षणाचे काम नक्की योग्य पद्धतीने होईल का असा प्रश्न उपस्थित झाला आहे. मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील नागरिकांच्या सर्वेक्षणाचे काम सुरू झाले. महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगाच्या आदेशानुसार मुंबईतही सर्वेक्षण करण्यात येत असून महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि अभियंते शहर, उपनगर जिल्ह्यांमध्ये मराठा सर्वेक्षण करणार आहेत. आयोगाच्या आदेशानुसार निर्धारित करण्यात आलेले प्रश्न प्रगणक व पर्यवेक्षक नागरिकांना विचारणार आहेत. हे काम महानगरपालिकेच्या अभियंत्यांबरोबरच आरोग्य सेविका, शिक्षक आणि सफाई कामगारांनाही देण्यात आले आहे. त्याकरीता महानगरपालिका प्रशासनाने आपल्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे. या कर्मचाऱ्यांमध्ये निरक्षर सफाई कामगारांचाही समावेश असल्याची बाब समोर आली आहे.

# रामलल्लाच्या दर्शनासाठी अलोट गर्दी

## एटीएस - आरएएफचे जवान तातडीने अयोध्येला

आधुनिक केसरी न्यूज

**अयोध्या : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याहस्ते 22 जानेवारीला रामलल्लाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. अयोध्येतील नभव्य राम मंदिरात दर्शनासाठी पहिल्याच दिवशी भाविकांची मोठी गर्दी झाली आहे. गर्दी हाताळण्यासाठी पोलिसांचीही धडपड सुरू आहे. मंदिरातील वाढती गर्दी पाहून एटीएस आणि आरएएफच्या जवानांना रामलला मंदिराच्या आत पाठवण्यात आले आहे. भाविकांच्या गर्दीचा फायदा घेत कोणत्याही गोष्टी घडू नये म्हणून एटीएस कमांडो टीम आणि रॅपिड ॲक्शन फोर्सच्या जवानांना मंदिरात तपासणी आणि सुरक्षेसाठी पाठवण्यात आले आहे. राम मंदिर आजपासून सर्व भाविकांसाठी खुले झाले आहे. सकाळपासूनच लोकांच्या रांगा लागल्या आहेत.**

### प्रशासनाने घेतला महत्त्वाचा निर्णय

राम मंदिरात रामललाच्या दर्शनासाठी लागलेल्या भाविकांची मोठी रांग पाहायला मिळत आहे. अतिशय चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत बाराबंकी पोलिसांनी अयोध्येकडे जाणाऱ्या भाविकांना थोडा वेळ थांबण्याची विनंती केली. मंदिरातील भाविकांच्या गर्दीचा दाखला देत पोलिसांनी त्यांना थोडा वेळ थांबण्यास सांगितले आहे. आता अयोध्या पोलिसांनी जिल्ह्याच्या सीमेवरच बाहेरून येणाऱ्या भाविकांना रोखले आहे. आतापर्यंत अयोध्येत आलेल्या भाविकांना दर्शन देण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे. त्यानंतरच बाहेरून येणाऱ्या भाविकांना प्रवेश मिळेल. या प्रकरणाचे गांभीर्य पाहून मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी प्रधान सचिव (गृह) संजय प्रसाद आणि महासंचालक (कायदा व सुव्यवस्था) प्रशांत कुमार यांना अयोध्येला जाण्यास सांगितले आहे. ही गर्दी पाहता मंदिर व्यवस्थापनाने दर्शन सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. आरतीच्या वेळीही राम लल्लाचे दर्शन देण्याचे ठरवले आहे. यासोबतच मंदिरात चेंगराचेंगरी होऊ नये म्हणून प्रवेश आणि बाहेर जाण्यासाठी स्वतंत्र मार्ग निश्चित करण्यात आला आहे. ही गर्दी पाहता पोलिसांनी अनेक ठिकाणी मार्ग वळवण्याचे कामही केले आहे.

अयोध्येतील गर्दी पाहता आजूबाजूच्या जिल्ह्यातही पोलीस सक्रिय झाले आहेत. अयोध्येपासून 60 किलोमीटर अंतरावर असलेल्या बाराबंकी येथील पोलिसांनी भाविकांना अयोध्या धाममध्ये न जाण्याचे आवाहन केले आहे. सर्व प्रकारच्या वाहनांचे मार्गही बदलण्यात आले आहेत. रामलल्लाच्या दर्शनासाठी पहिल्याच दिवशी एक लाख लोक येण्याची शक्यता वर्तवली गेली होती. त्यानंतर दरदिवशी ५० हजारांहून अधिक लोक येण्याची शक्यता वर्तवली गेली होती. सुमारे 500 वर्षांनंतर राम मंदिर बनवण्यात आले असून रामलल्ला येथे विराजमान झाले आहेत. 22 जानेवारी रोजी सुमारे 8000 आमंत्रित लोकांच्या उपस्थितीत मोदी यांनी रामलल्लावर अभिषेक केला. 23 जानेवारीला मंदिराचे दरवाजे उघडण्यात आले.

# अध्ययन, अध्यापन पद्धतीमध्ये आमूलाग्र बदल आवश्यक

## डॉ. पंडित विद्यासागर : गांधी महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**कडा :** नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे नावीन्यपूर्ण व शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल घडवणारे आहे परंतु त्यासाठी अध्ययन व अध्यापन पद्धती मध्ये आमूलाग्र बदल करावा लागेल. असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड चे माजी कुलगुरू डॉ. पंडित विद्यासागर यांनी केले. श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ कडा या शिक्षण संस्थेच्या शताब्दी महोत्सवानिमित्त आयोजित हवामानातील बदल आणि आत्मनिर्भर भारता पुढील आव्हाने या विषयांवरील २ दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष योगेश भंडारी, कार्याध्यक्ष कांतीलाल चाणोदिया, विश्वस्त अध्यक्ष गोकुळदासजी मेहेर, प्रधानमंत्री हेमंत कुमार पोखरणा, कोषाध्यक्ष डॉ. उमेश गांधी, उपाध्यक्ष अनिलकुमार झाडमुथा, बिपीन भंडारी, संचालक संजय मेहेर, संतोष गांधी, अजय चोरबेले, संजय कोठारी, बाबुलालजी भंडारी, संतोष भंडारी, ललित कुमार कटारिया, संतोष शिंगवी, अनिल मेहेर, डॉ. राधेश्याम प्रधान, उच्च शिक्षण विभागाचे सह संचालक सुरेंद्र ठाकूर, प्रा. डॉ. के. एम. जाधव, डॉ. संजय चाकणे, डॉ. व्यंकटेश लांब, डॉ. सय्यद अजरुद्दिन, हवामान तज्ञ डॉ. बी. एन. शिंदे, डॉ. सुरुची पांडे, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे शाखा व्यवस्थापक धीरज सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी, प्राचार्य हरिदास विधाते, प्राचार्य डॉ. सोपानराव निंभोरे, संस्थेचे कार्यकारी अधिकारी प्रा. नवनाथ पडोळे, बी. फार्मसी चे प्राचार्य डॉ. गफार सय्यद, डि. फार्मसी चे प्राचार्य डॉ. महेश म्हस्के, विद्यालयाचे मुख्याध्यापक मथाजी शिकारे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना डॉ. पंडित विद्यासागर म्हणाले की, नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे विद्यार्थ्यांना कौशल्याधारित व्यावसायिक शिक्षण देण्यास उपयुक्त ठरणारे आहे. त्यामध्ये विद्यार्थ्यांना विषयाच्या निवडीचे स्वतंत्र आहे. महाविद्यालयांना स्वायत्तता व संशोधनाला चालना देणारे आहे. शिक्षणाच्या नियोजनात सुसूत्रता आणणारे आहे मात्र नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबविताना अनेक आव्हाने देखील आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने शिक्षकांच्या मानसिकतेमध्ये बदल होणे आवश्यक आहे. अध्ययन व अध्यापन पद्धती खडू, फळा आणि वर्ग यांच्या पलीकडे जाणारी आहे. कौशल्यपूर्ण शिक्षण देणासाठी विद्यार्थ्यांना अनेक नवीन सुविधा उपलब्ध करून द्याव्या लागतील. त्यासाठी सरकारने आपले धोरण लवचिक ठेवणे आवश्यक आहे.




त्याच बरोबर मूल्यमापनाच्या पद्धतीत होणार बदल स्विकारावा लागेल. संस्थेचे प्रधानमंत्री हेमंत पोखरणा म्हणाले की, या २ दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेत होणाऱ्या चर्चेचा फायदा येणाऱ्या पिढीला होणार आहे. कारण ही संस्था गेल्या १०० वर्षांपासून समाजाचे आरोग्य, शिक्षण, समाजसेवा व संस्कृती रक्षणासाठी अविरतपणे कार्य करीत आहे. श्री अमोलक ऋषी महाराज यांनी घालून दिलेल्या शिकवणुकीनुसार संस्थेची वाटचाल सुरू आहे. यावेळी डॉ. राधेश्याम प्रधान, डॉ. सुरेंद्र ठाकूर, डॉ. संजय चाकणे यांचीही भाषणे झाली. संस्थेच्या वतीने उपस्थित सर्व मान्यवरांचा मानपत्र, शाल, व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

प्रा. डॉ. राधाकृष्ण जोशी यांनी समाज माध्यम प्रसिद्धी ची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. गांधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नंदकुमार राठी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अमोल कल्याणकर यांनी सूत्र संचालन केले. तर उपप्राचार्य डॉ. जवाहर भंडारी यांनी आभार मानले. मान्यवरांच्या हस्ते श्री अमोलक ऋषी महाराज व सरस्वती च्या प्रतिमेचे पूजन व दिप प्रज्वलन करून या परिषदेचे उद्घाटन झाले. डॉ. योगेश रसाळ, डॉ. सय्यद अझरुद्दिन यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. यावेळी विविध शोध निबंधाचे प्रकाशन झाले. उद्घाटन सत्रानंतर डॉ. राधे श्याम प्रधान, डॉ. बी.एन. शिंदे, व डॉ. सुरुची पांडे यांची भाषणे झाली. उद्घाटन सत्रासाठी डॉ. नरेंद्र गवळी, डॉ. सोमनाथ हसे, डॉ. शिवाजी जगदाळे, डॉ. नवनाथ कराळे, डॉ. प्रकाश जाधवर, डॉ. विशाल वैद्य, डॉ. सुदाम जाधव, डॉ. रमेश आबदार, डॉ. युनूस सय्यद, डॉ. उध्दव चव्हाण, डॉ. धनश्री मूनोत, डॉ. अनिल गर्जे, डॉ. विष्णू गव्हाणे, डॉ. तुकाराम गोंदकर, डॉ. सुपर्णा देशमुख आदींनी परिश्रम घेतले. यांनी परिश्रम घेतले.

# वीजजोडणी न करता शेतकऱ्याला सोळा हजारांचे बिल

## महावितरण कंपनीचा भोंगळ कारभार


आधुनिक केसरी न्यूज

शिऊर : विहिरीवर विद्युत पुरवठा करण्यासाठीचे कोटेशन भरल्यानंतर कुठलीही वीजजोडणी न देताच महावितरण कंपनीने थेट १६ हजार २९० रुपयांचे वीज बिल दिल्याचा धक्कादायक प्रकार शिऊर सब स्टेशनअंतर्गत असलेल्या पेंडेफळ येथे उघडकीस आला.

पेंडेफळ येथील शेतकरी नाना पुंजाबा आहेर यांची गटनंबर ७९ मध्ये शेतजमीन आहे. या ठिकाणी विहिरीचे खोदकाम केले आहे. या विहिरीचे काम झाल्यानंतर हंगामी शेतातील पिकांना पाणी देता यावे यासाठी वीजजोडणीसाठी आहेर यांनी ६ मे २०२० मध्ये शिऊर येथील सब स्टेशनअंतर्गत ऑनलाईन ५ एचपी पंपासाठी ऑनलाईन अर्ज केला होता. दुसऱ्या दिवशी ६ हजार ७४८ रुपये ऑनलाईन पद्धतीने महावितरण कंपनीला जमा केले. महावितरण कंपनीकडून नवीन डीपी (रोहित्र) बसविण्यात येणार होती. तेव्हापासून ते महावितरण कार्यालयात रोहित्रासाठी खेट्या घालत होते.


दरम्यान, गेल्या तीन वर्षांपासून रोहित्र मिळावे यासाठी महावितरण कंपनी कार्यालयाचे उंबरठे झिजवणाऱ्या नानासाहेब आहेर यांना नुकतेच जानेवारी २०२४ मध्ये वीज बील प्राप्त झाले आहे. यामध्ये दि. १ ऑक्टोबर २०२३ ते १ जानेवारी २०२४ पर्यंतचे १६ हजार २९७ रुपयांचे वीज बिल देण्यात आले आहे. महावितरणच्या यावर्षी पावसाने दगा दिल्याने खरीप पिके उद्ध्वस्त झाली असून, शेतकऱ्यांसमोर वर्षभराच्या चारचंदीचा प्रश्न निर्माण झाला आहे. माझ्या शेतात वीजजोडणी न देताच पाठविलेले वीज बिल म्हणे जखमेवर मीठ चोळण्याचा प्रकार असून, या माझ्या तक्रारीची दखल न घेता उडवाउडवीची उत्तरे दिले जात असल्याचा आरोप शेतकरी नानासाहेब आहेर यांनी केला.

या भोंगळ कारभाराने शेतकऱ्याची झोप उडाली असून, वीजजोडणी न देताच आलेल्या बिलाच्या रकमेमुळे महावितरण कार्यालयात धाव घेतली आहे. मात्र, त्यांच्या तक्रारीची दखल न घेता त्यांना वैजापूर, कन्नड आणि छत्रपती संभाजीनगर कार्यालयात अर्ज करण्याचा सल्ला महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून देण्यात येत आहे.



# निसर्गरम्य श्रीक्षेत्र बदामी

## उगवतीचे रंग



विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

मंदिराभोवतीचा परिसर अतिशय निसर्गरम्य असून नारळ, केळी, सुपारी, नागवेली, चिंच आदी झाडांनी वेढलेला आहे. मंदिरासमोर दगडी बांधकाम केलेले सुंदर असे हरिद्रातीर्थ आहे. मंदिराच्या बाहेर पूजासाहित्याची भरपूर दुकाने आहेत. त्याचप्रमाणे त्या भागात ऋतूनुसार उपलब्ध असणाऱ्या फळांची रेलचेल पाहायला मिळते. आरती, पूजा इ. नित्योपचार झाल्यानंतर दुपारी १२।। ते दोन या वेळेत भक्तांसाठी प्रसादाची व्यवस्था केली जाते. शाकंभरी मातेला गव्हाची खीर आणि पुरणाचे कडबू हे पदार्थ प्रिय आहेत. तेथील नैवेद्यात आणि प्रसादात या पदार्थांचा समावेश अवश्य असतो. शाकंभरी देवीचा नवरात्रोत्सव पौष शुद्ध अष्टमी ते पौर्णिमेपर्यंत साजरा केला जातो. या काळात भाविकांची दर्शनासाठी प्रचंड गर्दी असते. दरवर्षी वैशाख अमावास्येच्या आदल्या दिवशी म्हणजे कृष्ण चतुर्दशीला देवीचा जन्मोत्सव साजरा केला जातो. याचे वैशिष्ट्य म्हणजे या दिवशी देवीला आमरसाने अभिषेक केला जातो. त्या दिवशी प्रसाद म्हणूनही भाविकांना आमरसच दिला जातो. दर शुक्रवारी पालखी सेवा असते. तसेच नित्योपचारातील एक महत्वाची गोष्ट म्हणजे ' वट्टलसेवा ' म्हणजेच शेजारती. सायंकाळी पूजाविधी संपल्यानंतर मंत्रघोषात देवीच्या अंगावरील अलंकार उतरवले जातात. रात्री नऊच्या सुमारास दूध,फळे ठेवण्यात येतात. पाळण्यात अक्षदा घालून उत्सवमूर्तीला झोपवले जाते. अत्यंत भक्तिभावाने पाळणा हलवत देवीसाठी अंगाईगीत म्हटले जाते. हलकेच गर्भगृहाचा दरवाजा बंद केला जातो. बदामीच्या परिसरात बदामी लेणी असून ती प्रेक्षणीय आहेत. देशविदेशातील लोक ही लेणी पाहण्यासाठी येतात. सहाव्या शतकातील चालुक्य राजांच्या काळातील त्यांची निर्मिती आहे. **क्रमशः**




## आनंदी पहाट



# विम्याचे महत्त्व व गरज

आधुनिक केसरी

विम्याचे महत्त्व कधीही कमी असल्याचे मानू नये. अनपेक्षित परिस्थितींविरूद्ध विमा एक महत्त्वपूर्ण ढाल म्हणून कार्य करते. हे तुमचे अनियोजित खर्चापासून संरक्षण करते आणि अपघात, आजार आणि बरेच काही यापासून आर्थिक पाठबळ देते. विमा संरक्षण तुमच्या अनुपस्थितीत तुमच्या कुटुंबाच्या आर्थिक हिताचे रक्षण करते. हे त्यांना त्वरित खर्च सुरक्षित करण्यात मदत करते आणि त्यांची दीर्घकालीन आर्थिक स्थिरता सुरक्षित करते. विम्याच्या गरजेवर पुरेसा भर दिला जाऊ शकत नाही. विमा संरक्षण कुटुंबांना आर्थिक स्थैर्य प्रदान करते आणि त्यांना शिक्षण, कर्ज, गृहनिर्माण, किराणा सामान आणि इतर बरेच काही यांसारख्या खर्चाची तरतूद करण्यात मदत करते. हे अनपेक्षित परिस्थितीत आर्थिक स्थिरता देखील सुनिश्चित करते आणि वैद्यकीय खर्च, मालमत्तेचे नुकसान आणि इतर तत्सम खर्च करण्यात मदत करते. पॉलिसीधारकाच्या अनुपस्थितीत कुटुंबातील हयात असलेल्या सदस्यांना त्यांच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सक्षम करून विमा वैयक्तिक आर्थिक वाढीसाठी उत्प्रेरक म्हणून कार्य करते. तुमच्या प्रियजनांना शिक्षणासारख्या अत्यावश्यक संसाधनांमध्ये प्रवेश आहे, याची खात्री करण्यासाठी हे सुरक्षा जाळे प्रदान करते. तुमचे प्रियजन व्यवसायात गुंतवणूक करून, रिअल इस्टेट खरेदी करून आणि बरेच काही करून त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी विमा पेआउट वापरू शकतात. या पॉलिसी दीर्घकालीन बचत आणि गुंतवणुकीच्या संधी देतात त्याचप्रमाणे तुम्हाला तुमचे आर्थिक भविष्य सुरक्षित करण्याची परवानगी देतात. सेवानिवृत्ती, मुलाचे उच्च शिक्षण आणि इतर विविध आर्थिक उद्दिष्टांसाठी जीवन विमा वापरला जाऊ शकतो. आजच्या काळात विम्याचे महत्त्व विशेष आहे. वैद्यकीय महागाई आणि विविध आजारांच्या वाढत्या वारंवारतेमुळे वैद्यकीय खर्च गगनाला भिडत आहेत. त्यामुळे, यावेळी मजबूत आरोग्य विमा पॉलिसी असणे आवश्यक आहे. आरोग्य विमा वैद्यकीय खर्चाविरूद्ध आर्थिक संरक्षण देते.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655



आधुनिक केसरी

## लोचनी दाटली | मोगराई ||

मोगऱ्याच्या संगे | मोगराचि झालो ||
आता दारी आलो | ज्ञानाईच्या ||१||
मोगऱ्याचा संग | मनासी जडला ||
मोगरा फुलला | काळजात ||२||
तुकाई सांगते | मोगरा महती ||
मोगरा अद्वैती | गंधाळला ||३||
श्वासात मोगरा | चित्तात मोगरा ||
संचित मोगरा | जन्म झाला ||४||
रूजता मोगरा | लेखणी बोलली ||
लोचनी दाटली | मोगराई ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## निरुपण

आधुनिक केसरी

द्रव्य होतें मेळविलें ।तेंही लग्नास वेचलें ।
कांतेसिही धरून नेलें ।दुराचारी ॥३२॥
मजही वृद्धाप्य आलें ।लेंकीं वेगळें घातलें ।
अहा देवा वोढवलें ।अदृष्ट माझें ॥३३॥
द्रव्य नाहीं कांता नाहीं ।ठाव नाहीं शक्ति नाहीं ।
देवा मज कोणीच नाहीं ।तुजवेगळें ॥३४॥

## घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !

महावीर्य्य शिलवान हो,
सत्यवादी विद्वान ।
अति न्यायी गुरु पूजक, आस्तिक
उत्तम जान ।।०५ ।।(स्वर्वेद षष्ठ
मण्डल षष्ठ अध्याय) ०६/०६/०५
मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :
उत्तम जिज्ञासू तोच आहे, जो अति पराक्रमी, सुशील, सत्यवादी, विद्वान, अत्यंत वैराग्यवान, सद्गुरूंची सेवा, पूजा करणारा तसेच गुरु-प्रभूत पूर्ण आस्था, प्रेम असणारा आहे.



स्वर्वेद रचनाकार
अनन्त श्री सद्गुरू
सदाफल देवजी
महाराज

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

## निसंदेहनिरूपण

आधुनिक केसरी

जन्म मृत्यूच्या फेरे हे चालूच असतात. भोग हे भोगावेच लागतात. पण योगी सत्पुरुष हे अनेकानेक यातना भोगत रहातात् आणि आपण काही भोगले नाही असे सांगतात. म्हणून ते ब्रम्ह पदाला पोहोचलेले असतात. माणूस ब्रम्हज्ञानी असला तरी त्याला अनेक दुःख,संकटाचा सामना हा करावयाचं लागतो. या संकटामुळे तो खचत नाही डगमगत नाही.आपल्या मनावर परिणाम करून घेत नाही. सामान्य माणूस आलेल्या लहानमोठ्या संकटामुळे खचून जातो. सामान्य माणसाला धैर्य मिळावे यासाठी सतत संतवचनावर विश्वास ठेवावा.सामान्य जनता डगमगू नये यासाठी समाज सुखी रहावा यासाठी लहानपणापासून घरात, आजूबाजूच्या परिसरात सतत परब्रम्हाचा वास असावा. संतसज्जनांचा सहवास लाभावा. आत्मज्ञान ही फार मोठी संपत्ती आहे.ती जर नसेल तर अज्ञान रूपी दारिद्र्य सतत पाठीवर असते. तो सतत अडचणीत येत असतो. देह बुध्दीच्या आहारी गेल्यामुळे तो जन्ममरणाच्या फे-यातून सुटत नाही. योगी ज्ञानी, चतुरस्त्र व्यक्तिमत्त्वाचे लोक आपला विकास करू देन घेतात.



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## गहिनीनाथ


आधुनिक केसरी

तें पाहून एक वेळ तुला मच्छिंद्रनाथ भेटेल, तूं कांहीं चिंता करुं नको, असें सांगून उपरिक्षवासु आपल्या स्थानीं गेला. मग ती मुलावर प्रीति करून आनंदानें राहिली. इकडे गर्भाद्रिपर्वतावर गहिनीनाथास अभ्यास करविण्याकरितां गोरक्ष व मच्छिंद्रनाथ राहिले. उमाकांतहि तेथेंच होते. त्या सुवर्ण पर्वतावर अदृश्यास्त्राची योजना करून कुबेर आपल्या स्थानीं गेला. अदृश्यास्त्राच्या योगानें सुवर्णाचा वर्ण झांकून गेला; परंतु त्या पर्वतावर शंकर राहिले. ते अद्यापि तेथेंच आहेत. त्यास 'म्हातारदेव' असें म्हणतात. त्याच्या पश्चिमेस कानिफनाथ राहिला; त्यानें त्या गांवाचें नांव मढी असें ठेविलें. त्याच्या दक्षिणेस मच्छिंद्रनाथानें वसति स्थान केलें. त्याच्या पूर्वेस जालंदरनाथ राहिला. त्याच पर्वताच्या पलीकडे वडवानळ गांवीं नागनाथानें वस्ती केली. विटे गांवांत रेवणसिद्ध राहिला. गर्भाद्रिपर्वतावर वामतीर्थी गोरक्षनाथ राहिला. त्यानें तेथेंच गहिनीनाथाकडून विद्याभ्यास करविला. **क्रमश**

# भगवंत आणि मी वेगळे नाहीत

आधुनिक केसरी

समुद्राचा फेस खरा आहे असे वाटले, तरी त्याच्याखाली पाणीच असते. असत्य हे नेहमी सत्याला धरूनच राहते. जे नाही ते तोंडाने सांगणे ही माया. तिला आपण खरे मानतो. मायेला असत्य मानले की ब्रह्माला सत्यत्व येते. आपण मायेच्या पाठीमागे जातो, पण माया ही मृगजळाप्रमाणे आहे असे समजते तेव्हा आपण स्वस्थ होतो. जन्माच्या वेळेस ' सोऽहं ' म्हणत होता, नंतर ' कोऽहं ' म्हणू लागला आणि शेवटी ' देहच मी ' म्हणू लागला ! वास्तविक, सूर्य आणि त्याचे किरण हे जसे वेगळे नाहीत, त्याप्रमाणे ' भगवंत ' आणि ' मी ' वेगळे नाहीत. सत्य म्हणजे अखंड टिकणारे ते, म्हणजे परमात्मस्वरूप होय. सच्चिदानंदस्वरूपाच्या ठिकाणी मन चिकटून राहणे यालाच अनुसंधान असे म्हणतात. भगवंतावाचून इतर सर्व म्हणजेच उपाधी होय. ' मला कळत नाही ' असे वाटणे, ही परमार्थाची पहिली पायरी आहे; आणि मी आणि भगवंत वेगळे नाहीत असे अंगी मुरणे ही शेवटची पायरी होय. ' जे जे घडते त्याचा कर्ता परमात्मा आहे, मी फक्त कर्तव्यापुरता आहे ' असे वाटणे, यालाच निष्काम कर्म असे म्हणतात; आणि ' आले तर भोगले, गेले तर सोडले ' हे सहजकर्म होय; दोष बाधू नयेत अशा रीतीने केलेले कर्म ते ज्ञानयुक्त कर्म होय; आणि ईश्वराच्या स्मरणात केलेले कर्म त्याला निरासक्त कर्म असे म्हणतात. ' अमुकच फळ मला मिळावे ' ही वृत्ती सोडणे, याचे नाव निरासक्ती होय. विषयांची विरक्ती झाली की त्याला ज्ञान झाले असे म्हणतात.



थोडक्यात म्हणजे जे कर्म बंधनाला कारण होते ते अज्ञान आणि जे मोक्षाला कारण होते ते ज्ञान समजावे. कर्ममार्ग, उपासनामार्ग, नवविधाभक्ती इ. सर्वांनी गाठण्याचे ध्येय एकच असते. लग्नात ज्याप्रमाणे अमुक एक खर्च मी जास्त करीन, दुसरा कमी करीन असे माणूस म्हणतो, पण मुख्य कार्य हे, की मुलीला नवरा गाठून देणे; त्याप्रमाणे भगवंताची भेट होणे हे मुख्य होय. आपली देहबुद्धी संतांच्या संगतीच्या आड येऊ देऊ नये. भगवंताच्या, स्वरूपदर्शनाच्या आड माझ्या देहबुद्धीचा पर्वत येतो. सर्व साधनांचा उपयोग अभिमान नाहीसा करण्यासाठी असतो. नामस्मरणाने हे काम लवकर होते आणि म्हणूनच सर्व साधनांचे सार भगवंताचे नाम हेच आहे. ते आपण श्रद्धापूर्वक घ्यावे आणि भगवंताशी एकरूप व्हावे. आपण प्रयत्न करीत असताना, भगवंत माझ्या पाठीशी आहे ही भावनाच आपल्याला उद्धरून नेईल याची खात्री बाळगा आणि भगवंताच्या नामात आनंदाने कालक्रमणा करा.

**१५८. आज तुम्हाला जेवढा वेळ रिकामा मिळतो, तेवढा सगळा भगवंताच्या नामात घालवण्याचा प्रयत्न करा.**

आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

बुधवार, २४ जानेवारी २०२४

adhunikkesari.com Adhunik Kesari


# पत्रकारांनी वंचितांचा आवाज बनावे : वसंत मुंडे

आधुनिक केसरी न्यूज

**माजलगाव :** सध्याचे राजकीय वातावरण पाहता लोकशाही जीवंत ठेवण्याची जबाबदारी खऱ्या अर्थाने पत्रकारांवरच आली आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार, राजकीय विश्लेषक राही भिडे यांनी केले. त्या माजलगाव येथे गुरूवार १८ रोजी मूकनायक आणि माजलगाव भूषण सन्मान सोहळ्यात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होत्या. माजलगाव एकता पत्रकार संघाच्यावतीने मूकनायक आणि माजलगाव भूषण सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीडचे आमदार संदीप क्षीरसागर, प्रमुख अतिथी म्हणून जेष्ठ पत्रकार, राजकीय विश्लेषक राहीताई भिडे, महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, माजी आमदार सय्यद सलीम, माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, माजी आमदार मोहनराव सोळंके, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस रविकांत राठोड, भाजपा नेते रमेश आडसकर, पत्रकार भागवत तावरे आदींनी उपस्थिती होती. प्रारंभी प्रास्ताविक संयोजक तथा माजलगाव एकता पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्योतिराम पांढरपोटे यांनी केले.

पुढे बोलताना राही भिडे म्हणाल्या, सध्याची राजकीय परिस्थिती विदारक असून लोकशाही धोक्यात आलेली असताना ती वाचवण्यासाठी आता पत्रकारांवर खरी जबाबदारी आली आहे. अध्यक्षीय भाषणात आमदार संदीप क्षीरसागर म्हणाले, पत्रकारिता हा व्यवसाय नसून ते व्रत आहे. पत्रकारच समाजाचा खरा आरसा आहे. लोकप्रबोधनाबरोबरच राजकरण्यांना योग्य दिशा देण्याचे कामही पत्रकार करत असतात.

माजलगाव शहरातील वैष्णवी मंगल कार्यालयात हा सन्मान सोहळा थाटात रंगला. मान्यवरांच्या हस्ते मूकनायक सन्मान आरोग्यदूतचे संपादक बाबा श्रीहरी देशमाने, दै. मराठवाडा पत्रचे संपादक दत्तात्रय नरनाळे यांना प्रदान करण्यात आला. आहे. तर माजलगाव भूषण पुरस्कार कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नितीनराव नाईकनवरे, अ‍ॅड. भानुदास डक, रविंद्र कानडे, रामराजे रांजवण, डॉ. गणेश आगे,सरपंच सौ. सिमाताई सोळंके,इम्रान ताहेर सलीम खान, तलाठी सुर्यकांत गवई, ग्रामसेवक महेश गेंदले यांना प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन राहुल गिरी यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी माजलगाव एकता पत्रकार संघाच्यावतीने संयोजक, पत्रकार ज्योतिराम पांढरपोटे, वाजेद पठाण, अमर साळवे, राजेभाऊ पाष्टे,नय्युम आत्तार,वसंत परसे यांनी अथक परिश्रम घेतले. विविध वरीष्ठ पदावर अधिकारी म्हणुन कार्यरत असलेले व राज्यातील विविध भागात माजलगावचा नावलौकिक करणारे अहमदनगर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. पंकजकुमार वसंतराव जावळे, यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्याचे तहसीलदार डॉ. शिवाजी रामेश्वर मगर आणि परळी येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागात सहायक अभियंता-श्रेणी-२ म्हणून कार्यरत असलेल्या दीपाली गिते यांचाही या कार्यक्रमात विशेष गौरव करण्यात आला. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे म्हणाले, पत्रकारांनी वंचितांचा आवाज बनावे. सामान्य माणसांची प्रश्न समजून घेत त्यावर पत्रकारांनी आवाज उठवण्याची खरी गरज आहे. माजलगाव एकता पत्रकार संघाच्या वतीने दरवर्षी पत्रकारीता क्षेत्रात उत्कृष्ट काम करणाऱ्या पत्रकारासह माजलगाव तालुक्यातील सामाजिक कार्यात,आरोग्यरुग्ण सेवेमध्ये,उद्योजक, सहकारासह इतर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या बीड जिल्हा आणि माजलगाव तालुक्याच्या मातीतील व्यक्तीस मुकनायक व माजलगाव भूषण पुरस्कार देऊन गेल्या चार वर्षापासून सन्मानीत करण्यात येते. यंदाचे हे ५ वे वर्ष आहे.




माझ्या मातीतला सन्मान माझ्यासाठी मोलाचा : बाबा देशमाने : मूकनायकचे मानकरी संपादक बाबा श्रीहरी देशमाने यांनी मनोगत मांडताना सांगितले, माझे अनेक राज्य, देश पातळीवर अनेक सन्मान झाले मात्र माझ्या मातीतला हा सन्मान माझ्यासाठी खुप मोलाचा आहे . समाजातील शेवटच्या घटकांची प्रश्न मांडणारा पत्रकारच असतो . सामाजिक आंदोलने उभी करण्याचे सामर्थ्य केवळ पत्रकारांमध्येच असते . पत्रकार हा लोकांचा आवाज असतो, असे प्रतिपादन पत्रकार भागवत तावरे यांनी केले .




## बोरी येथे मराठी भाषेचे 18 शिक्षक जैन वाचनालयातर्फे सन्मानित

आधुनिक केसरी न्यूज

**नेमिनाथ जैन**

**बोरी :** 14 जानेवारी ते 28 जानेवारी दरम्यान सर्वत्र मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त विविध उपक्रम राबविले जात आहेत. बोरीच्या कै. जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने आज मराठी भाषा शिकविणाऱ्या विविध शाळांतील 18 शिक्षकांचा गौरव करण्यात आला. वाचनालयाचे अध्यक्ष सौ.मिना जैन ,उपाध्यक्ष पवन ओझा, सचिव बालाप्रसाद सोमानी तसेच सूर्यप्रकाश सोनी ,दीपक राजुरकर, सौ. कांता सोमानी यांनी हा उपक्रम राबविण्याचे ठरवले होते . मराठी भाषेचा प्रचार व प्रसार शाळेतील शिक्षक अविरतपणे करीत आहेत. अशा शिक्षकांना अधिक चालना मिळावी यासाठी 18 शिक्षकांचा आज सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. त्यामध्ये जिल्हा परिषद केंद्रीय कन्या शाळेच्या सौ ज्योती उलेमाले, सौ नीता आव्हाड, सौ ज्योती स्वामी ,सौ मीरा आव्हाड, जिल्हा परिषद हायस्कूलच्या सौ संगीता कदम ,संतोष चिद्रवार, शिरीष बोरोले ,शकुंतलाबाई कदम बोर्डीकर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे दिगंबर काठोळे ,सौ मंगल क्षीरसागर, साईकृपा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे दीपक क-हाळे, प्रसाद चव्हाण तर ज्ञानोपासक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. दुर्गा देशमुख, बालाजी काळे, डी.सी .बुरकुले, राजेश ढोबळे, शिवाजी खोकले, माणिक ढोले, पंढरीनाथ लांडगे यांचा समावेश आहे. कार्यक्रमास एम.डी.माटे, मुख्याध्यापक पी.बी.रांजवन तसेच अभिजीत अंभुरे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ग्रंथपाल नेमीनाथ जैन यांनी केले. जैन वाचनालयाने राबवलेल्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे सर्व शिक्षकांनी कौतुक केले.

## एलसीबीने आवळल्या दरोडेखोरांच्या मुसक्या

### १ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** लळींग घाटात अनेक दिवसापूर्वी उधारीचे पैसे घेऊन परतणाऱ्या तरुणांना दरोदेखोरांनी लुटले होते. याप्रकरणी मोहाडी पोलिसांत गुन्हा दाखल झाला होता. मात्र, एलसीबीने समांतर करून मालेगावात जावून दरोडेखोरांच्या मुसक्या आवळल्या आहेत.

त्यामुळे आठवडाभराच्या आतच गुन्ह्याची यशस्वी उकल झाली आहे.

अनस अक्तर हुसेन खान हा तरूण आपले मित्र शमशाद असलम मलिक व दिलनवाज मोहम्मद खान यांच्यासमवेत दुचाकीने मालेगाव येथे गेला होता. तेथील एका व्यापाऱ्याकडे दिलनवाज खान यांच्या मालाची उधारी थकलेली होती. उधारीचे सुमारे २ लाख ४५ हजार ३०० रूपयांची रोकड घेवून ते तिघे मालेगाव येथून धुळ्याच्या दिशेने निघाले होते. तेव्हा दोन मोटारसायकलवरून आलेल्या दरोडेखोरांनी अनस खान यांना अडवून त्यांची पैशांची बॅग पळविली होती. लुटीची ही घटना १७ जानेवारी रोजी रात्री ११ वाजेच्या सुमारास घडली होती. यानंतर मोहाडी पोलिसांसह एलसीबीने तपास सुरू केला होता.

सदर गुन्ह्याचा तपास करताना एलसीबीला महत्त्वपूर्ण माहिती मिळाली. लळींग घाटातील गुन्हा हा चेतन गणेश परदेशी, रा. कलेक्टर पट्टा व त्याचे साथीदार मोमीन मुजाहीद हुसेन मुख्तार अहमद, रा. इस्लामपुरा, हर्षल उर्फ लहान्या देविदास जाधव, रा. कलेक्टर पट्टा, विवेक भिकन परदेशी, रा. नवी वस्ती, मोतीमाग नाक्याच्या पाठीमागे, अजय पाटील, रा. कलेक्टर पट्टा व अर्शद कांडी, रा. इस्लामपुरा, मालेगांव यांनी केल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी मालेगाव येथे धडक देवून चेतन परदेशी व मोमीन मुजाहीद हुसेन मुख्तार अहमद यांना त्यांच्या घरातून ताब्यात घेतले व दोघांनी गुन्ह्याची कबुली दिली. पोलिसांनी चेतन परदेशी याच्याकडून १३ हजारांची गुन्ह्यातील रोकड, १ लाख किमतीची केटीएम कंपनीची बाईक, ४० हजार किमतीचे गावठी पिस्टल, दोन हजाराचे दोन जीवंत काडतुस आणि १० हजारांचा मोबाईल असा १ लाख ६५ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. तर मोमीनकडून ६ हजारांची रोकड आणि १० हजारांचा मोबाईल आणि आधारकार्ड जप्त केले. पोलिसांच्या कारवाईत एकूण १ लाख ८१ हजारांचा मुद्देमाल घावला आहे.

सदरची कामगिरी एसपी श्रीकांत धिवरे, एएएसपी किशोर काळे यांच्या मार्गदर्शनाखाली पीआय दत्तात्रय शिंदे, अमरजीत मोरे, बाळासाहेब सूर्यवंशी,शाम निकम, संजय पाटील, हवालदार हेमंत बोरसे, प्रल्हाद वाघ, पंकज खैरमोडे, मच्छिंद्र पाटील, संतोष हिरे, महेंद्र सपकाळ, कैलास महाजन, पोकॉ. सुशील शेंडे, अमोल जाधव, हर्षल चौधरी, चापोकॉ. राजू गिते यांनी केली.



## संग्रामपुरात सासऱ्याने केला सुन, नातवाचा खून

आधुनिक केसरी न्यूज

**संग्रामपुर :** शहरात सासऱ्याने सून व नातवावर कुऱ्हाडीने वार करून दोघांचा निर्घृण खून केल्याची घटना मंगळवारी दुपारी घडली. संग्रामपूर शहरातील नारायण भिकाजी गायकी या ६५ वर्षीय इसमाने २५ वर्षीय सून अश्विनी गायकी, नातू समर्थ देवानंद गायकी या दोघांवर कुऱ्हाडीने वार केले.

यामध्ये १० वर्षीय समर्थ गायकी या बालकाचा जाग्यावरच मृत्यू झाला. गंभीर जखमी असलेली अश्विनी गणेश गायकी या महिलेला तातडीने उपचारासाठी शेगाव येथील रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र वाटेतच महिलेचा मृत्यू झाला. महिला ८ महिण्याची गरोदर असल्याची माहिती आहे. या ह्दयद्रावक घटनेने समाजमन सुन्न झाले आहे. दरम्यान घटनेची माहिती प्राप्त होताच तामगाव पोलीसांनी घटनास्थळी धाव घेतली. आरोपी नारायण भिकाजी गायकी याला ताब्यात घेण्यात आले आहे. तामगाव पोलीसांकडून पूढील तपास सूरू आहे.

# यात्रेला गालबोट

आधुनिक केसरी

खासदार राहुल गांधी यांच्या नेतृत्वातील काँग्रेसची भारत जोडो न्याय यात्रा सध्या आसाममध्ये आहे. मात्र, आसाममध्ये या यात्रेला गालबोट लागले आहे. यात्रेत सहभागी झालेले काँग्रेस कार्यकर्ते तसेच इतर सामान्य नागरिक आणि आसाम पोलिस आमनेसामने आल्यामुळे येथे तणावग्रस्त स्थिती निर्माण झाली आहे. या संघर्षात आसाम काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जखमी झाले आहेत. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सर्मा यांनी राहुल गांधी यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्याचा आदेश दिला आहे. आसाम काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष भूपेन बोराह आणि काँग्रेसचे नेते जाकीर हुसैन सिकदर हे दोघे पोलिसांशी झालेल्या संघर्षात जखमी झाले आहेत.आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सर्मा यांनी काँग्रेसच्या भारत जोडो न्याय यात्रेला गुवाहाटीमध्ये प्रवेश देऊ नका, असा आदेश यंत्रणांना दिला आहे. या यात्रेने शहरात प्रवेश केल्यास मोठ्या प्रमाणात गर्दी होईल, वाहतुकीची समस्या निर्माण होईल, असे मत सर्मा यांचे आहे. या निर्णयानंतर काँग्रेसचे कार्यकर्ते चांगलेच आक्रमक झाले आहेत. काँग्रेसची यात्रा उधळून लावण्यासाठी आसाम सरकारकडून सत्तेचा दुरुपयोग केला जात आहे, असा आरोप काँग्रेसने केला आहे. या यात्रेला शहरात प्रवेश देण्यास बंदी असली, तरी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी गुवाहाटीमध्ये प्रेवश करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांना पोलिसांनी रोखले. त्यानंतर काँग्रेसचे कार्यकर्ते आणि आसाम पोलिस यांच्यात काही काळासाठी संघर्ष निर्माण झाला. यात भूपेन सोराह आणि जाकीर सिकदर जखमी झाले. मंगळवारी (२३ जानेवारी) सकाळी भारत जोडो न्याय यात्रा मेघालयातून गुवाहाटीकडे निघाली होती. मात्र, मध्येच खानापारा परिसरात पोलिसांनी बॅरिकेड लावून गुवाहाटीकडे जाण्याचा रस्ता बंद केल्याचे या यात्रेकरूंना आढळले. यावर काँग्रेसचे कार्यकर्ते नवीन कुमार पासवान यांनी प्रतिक्रिया दिली. "पोलिसांनी आमच्यावर लाठीमार केला, मीदेखील यात जखमी झालो. माझ्या पायाला आणि हाताला जखम झाली आहे", असे पासवान यांनी सांगितले. काँग्रेसचे कार्यकर्ते आणि पोलिस यांच्यात संघर्ष निर्माण झाल्यानंतर सर्मा यांनी राहुल गांधींविरोधात गुन्हा दाखल करण्याचा आदेश दिला आहे. ही आसामची संस्कृती नाही, अशा प्रकारचे नक्षली डावपेच आमच्या प्रदेशात नाहीत, त्यामुळे मी आसामच्या डीजीपींना राहुल गांधींविरोधात गुन्हा दाखल करण्याचा आदेश दिला आहे. गर्दीला भडकावण्याच्या आरोपाखाली हा गुन्हा दाखल करावा, असे मी त्यांना सांगितले आहे. विशेष म्हणजे काँग्रेसच्या नेत्यांनी जे व्हिडीओ समाजमाध्यमांवर पोस्ट केले आहेत, त्याचा पुरावा म्हणून वापर करावा. राहुल गांधी यांच्या बेशिस्त वर्तनामुळे मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन झाले आहे, यामुळे गुवाहाटीमध्ये मोठ्या प्रमाणात वाहतूक खोळंबली आहे, असे हिमंता बिस्वा सर्मा म्हणाले.

# आयोध्येत रामलल्ला : नरेंद्र मोदी नेतृत्व चमत्कार



राम कुलकर्णी,
संपर्क 9422742577

आधुनिक केसरी

**22 जानेवारी 2024 चा सुर्य खऱ्या अर्थाने भारतवर्षात कालचक्र बदलणारा ठरला.पाचशे वर्षांचा संघर्ष, समस्त भारतवासी तथा सनातन हिंदु धर्माची अस्मिता पुनश्च विराजमान झाली असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. रामलल्लाची प्राणप्रतिष्ठापना म्हणजे गुलामी मानसिकतेतुन बाहेर पडणारा नवा इतिहासच ज्याची नोंद सुवर्ण अक्षराने लिहावी अन् हजारो वर्षे हा क्षण आणि दिवस अजरामर राहिल. हमारे रामलल्ला अब टेंटमें नही रहेंगे, दिव्य मंदिर में रहेंगे हे शब्द जेव्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उच्चारले तेव्हा तमाम रामभक्ताच्या अंगावर आलेले शहारे मनातील प्रतिबिंबित भाव बरंच काही सांगुन जातो.**

दुपारी 12.29 ला रामलल्ला दिव्य मुर्ती जेव्हा 138 कोटी लोकांना प्रत्यक्ष हजर राहिलेल्या आणि घराघरात दुरचित्रवाणीसमोर बसलेल्या लोकांना डोळ्यांनी पहाता आले तेव्हा पुन्हा एकदा कलियुगात त्रेतायुग अवतरले असाच भास मनाला झाला पण वर्षानुवर्षाचा संघर्ष आणि जे होणार का नाही ?ते झाल्याचा आनंद खऱ्या अर्थाने परिवर्तनाचा अमृतकाळ म्हणावा लागेल.

आयोध्येत काल 22 जानेवारी रोजी 12.29 मिनिटाला पवित्र शुभ मुहुर्तावर रामलल्ला विराजमान झाले. भव्य मंदिर त्या ठिकाणी करण्यात आलेली प्राणप्रतिष्ठा आणि रामलल्लाचं दर्शन प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिल्यानंतर खऱ्या अर्थाने प्रत्येक भारतवासीयांच्या ऱ्हदयाला पाझर फुटला, डोळ्यातुन आनंदाचे पाट वाहु लागले. त्रेतायुगात प्रभु रामचंद्र चौदा वर्षाचा वनवास संपुन आयोध्या सीमेवर आल्यानंतर ज्याप्रमाणे संपुर्ण आयोध्यानगरीला आनंद द्विगुणीत झाला, गुढ्या पताका उभारून त्या काळात स्वागत झाले. तसंच काही देशाच्या कानाकोपऱ्यात नव्हे तर जगाच्या पाठीवर अनेक देशात रामभक्तांनी आनंद साजरा केला. मागे वळुन पहाताना हे खरं आहे की, हा क्षण पहाण्यासाठी समस्त सनातन हिंदु धर्मातील लोकांनी एखादा दुसरा वर्षाचा काळ नव्हे तर तब्बल पाचशे वर्ष लढा दिला. तत्कालीन काळात बाबराने राम मंदिर पाडून त्या ठिकाणी मशिद बांधकाम केले. त्यामागचा दृष्टीकोन धर्मस्थापनेचाच असावा. कारण भारतीय हिंदु धर्माच्या मनातील अस्मिता कायमची पुसुन टाकावी या दुष्ट भावनेतुन मंदिर उद्धवस्त करून बाबरी मशिद बांधल्याचा इतिहास सांगतो. कालांतराने काय घडामोडी झाल्या ? आणि किती पराकोटीचा संघर्ष झाला ? मग देशाला स्वातंत्र्य मिळाल्यावर देखील आपल्या देशात सत्तास्थानावर जी व्यवस्था होती, त्यांनी केवळ मताच्या लाचारीमुळे राम मंदिराचा प्रश्न लोंबकळत ठेवला अशा प्रकारचा स्पष्ट शब्दांत आरोप केला तर चुकीचे काहीही नाही. पण असं म्हणतात की, अधर्म, अत्याचार वाढल्यानंतर सत्यासाठी ईश्वराचे आगमन भुतलावर होते. त्रेतायुगात देखील रावणाच्या जाचामुळे अधर्म वाढला, त्याचा नाश करण्यासाठी रामाचा जन्म झाला. द्वापारयुगात कंसाचा नाश करण्यासाठी श्रीकृष्णाचा जन्म तर हिंदवी स्वराज्याची स्थापना करण्यासाठी कालांतराने छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म अर्थात कालचक्र परिवर्तन पृथ्वीवर कालानुरूप घडत गेले पण सत्तास्थानी असलेल्या व्यवस्थेच्या नाकर्तेपणातुन हिंदु धर्मीयाची श्रद्धास्थाने कशा प्रकारे खिचपत आणि लोंबकळत ठेवली ज्यामुळे प्रभु रामचंद्राला वर्षानुवर्षे तंबुत रहावा लागले.



ऊन, पाऊस, वारा या संकटाचा सामना पाचशे वर्षे रामाने केला. धर्मसत्तेसोबत राजकिय सत्ता त्यांच्यात समन्वय असेल तर धार्मिक प्रश्नाची उकल कशी होवु शकते ? याचे उदाहरण वर्तमान कलियुगात पहायला मिळतं. 2014 पुर्वी आयोध्या राम मंदिराचा प्रश्न अगदी न्यायव्यवस्थेच्या लाल गठ्यात बांधुन ठेवलेला होता. त्यापुर्वी देखील संघर्ष होताना विश्व हिंदु परिषद, संघ परिवार, जनसंघ, भाजपा आदी पक्ष तथा सामाजिक संघटनाकडून राम मंदिर बांधणीच्या चळवळी सतत चालु राहिल्या. अगदी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी असताना देखील कारसेवा झाली. 06 डिसेंबर 1992 ला तर झालेली कारसेवा मशिद उद्धवस्त करण्या कारणीभुत ठरली. हिंदु बांधवांचा आक्रोश आणि श्रद्धेसाठी कशा प्रकारे संघर्ष केला जातो ? हा इतिहास देखील याच भारतभुमीत पहायला मिळाला. पण असं म्हणतात की, अधर्म, असत्य विनाशाचा मार्ग जेव्हा फोफावतो त्यावेळी राष्ट्र भक्तीची नवी चेतना जणु काही हिमालयातुन महाभगवती बाहेर पडावी तशी 2014 साली पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे नेतृत्व भारतमातेच्या रक्षणासाठी पुढे आलं आणि मग खऱ्या अर्थाने अमृतकाल उजाडला असं म्हणावे लागेल. मोदीजींच्या नेतृत्वाने राम मंदिर प्रश्नाची न्यायालयीन लढाई सक्षमपणे लढताना अखेर सबळ पुराव्यानिशी आयोध्या हेच प्रभु रामचंद्र अस्तित्व हे न्यायदेवतेला देखील मान्य करावे लागले. तदनंतर मंदिर बांधकामाचे भुमीपुजन पंतप्रधान मोदीजींनी केलं आणि ज्या क्षणाची वाट भारतातील 138 कोटी जनता पाहत होती तो क्षण काल आयोध्येत राम भक्तांनी प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिला. दुपारी 12.29 मिनिट काही सेकंदाच्या पवित्र मुहुर्तावर रामलल्ला थाटामाटात पुरोहितांच्या मंत्रोपच्चार घोषात स्थानापन झाले. ज्याचे साक्षीदार केवळ भारतातील रामभक्त नव्हे तर विदेशातील अनेक देशात प्रत्येक मंदिरात राम भक्तांनी उत्सव साजरा केला. तब्बल एक तासाचा उत्सव त्यावेळी रामलल्लाची पुजाअर्चा, विधिवत मंत्र यावरून भारतीय हिंदु संस्कृती किती पवित्र मंगलमय आहे याचे दर्शन पहायला मिळालं. अनेकदा हिंदु संस्कृतीच्या धार्मिकतेची चेष्टा होते मात्र काल सोहळ्या दरम्यान संपन्न झालेली विधिवत पुजा विज्ञानाचार्याला देखील मान्य करावीच लागली. प्रभु रामचंद्राची मुर्ती जेव्हा संपुर्ण देशातील रामभक्तांनी डोळ्यात सामावुन घेताना तो 12.29 मिनिटांचा क्षण आयुष्यात कधीच कुणी विसरणार नाही असाच होता. सावळं, गोजीरं स्वरूप, बालअवस्था, निरभ्र डोळे, कवचकुंडलं, सोनियाचा धनुष्य, पुष्पहार हा क्षण प्रत्येकांनी डोळ्यात टिपला तेव्हा खरं तर आनंदाचे आश्रुचे पाट घराघरातुन वहात होते.या आनंदाचं वर्णन शब्दातच करता येत नाही. भारतमातेचे स्वत्व परत आलं. आता नविन भारत बनाऐंगे या शब्दांत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहनजी भागवत यांनी वर्णन केलं. रामाला बाहेर काढले बाबराने आणि आत बसवले पंतप्रधान नरेंद्र मोदींनं हा खऱ्या अर्थाने दिवस देशाच्या भविष्यातील रामराज्य येणार या संकल्पाचा असु शकतो. प्रत्येकाच्या ऱ्हदयामध्ये संतुष्टीचा भाव आणि भावविभुर संतोष चेहऱ्यावर होता. खरं तर हे कार्य करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हिमालयातुन भगवती देवीने पाठवले, पाचशे वर्षाचा संघर्ष संपुन 22 जानेवारी हा दिवस खऱ्या अर्थाने युग परिवर्तीत युग असल्याचा दावा काल साधुसंतांनी बोलुन दाखविला. राजा तशी प्रजा हा आदर्श प्रत्येक युगात समाजाच्या समोर चालत आलेला आहे. धर्मशास्त्रात असलेली गुणसंपदा ही खऱ्या अर्थाने पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वात आहे ज्यांना विश्वगौरव म्हणुन नेतृत्वाला मान्यता मिळाली. खरं तर आपल्या हातुन रामलल्लाची प्रतिष्ठापना होणार यासाठी त्यांनी मंदिर ट्रस्टकडून धर्मशास्त्र विधिवत आचारसंहिता प्राणप्रतिष्ठा करण्यापुर्वीची कशी आहे ?विचारणा केली होती. त्यांना तीन दिवस उपवास करण्यास सांगितले पण मोदीजींनी तब्बल अकरा दिवस तपस्वी अनुष्ठान केले आणि देशांतर्गत भ्रमंती करून ज्या स्थळावर वनवासात प्रभु रामचंद्र गेले तिथे मोदीजी जावुन नतमस्तक झाले. ज्या वानरांनी रावणाच्या गावाला जाण्यासाठी सेतु बांधला त्या किनाऱ्यावर देखील मोदी जावुन आले. हा चमत्कार दैवी सद्गुणाचाच म्हणावा लागेल. स्वतः अकरा दिवसापासुन जमिनीवर आसनस्थ व्यवस्था करून घेतली होती. एकुणच काय तर राजाच्या अंगी राजस्वाचे गुण आणि नेतृत्वातुन प्रस्थापित होणारे आदर्श दाखविताना भारतीय संस्कृतीचा विसर न पडावा, भविष्याती कुणा हाच आदर्श त्यांनी दाखवुन दिला. बाकी काही असले तरी रामलल्ला प्रतिष्ठापना पुन्हा आयोध्यात मोठ्या उत्साहाने थाटामाटात पार पडली. त्यामुळे भारत का बच्चा बच्चा जय श्रीराम बोलेगा, मेरे झोपडी के भाग आज खुल जाऐंगे, आऐंगे आऐंगे राम आऐंगे अशा प्रकारचा भाव सुगंध संपुर्ण देशाच्या कानाकोपऱ्यात नव्हे तर विदेशात देखील दरवळलेला लोकांनी पाहिला. आतापर्यंत दिपावली वर्षातुन एकदाच साजरी होताना पहात आलो पण काल रामलल्ला विराजमान सोहळा त्याचा आनंद देशातील रामभक्तांनी आपआपल्या ठिकाणी असलेल्या मंदिरात मग फटाक्याची आतिषबाजी असेल, शोभायात्रा मिरवणुका असतील सर्वत्र साजरी झाला. कोटी कोटी कंठ ज्या क्षणाची वाट पहात होते, तो क्षण म्हणजे कालचा यात काही शंका नाही.

# पाल्याकडून अपेक्षा ठेवताना वास्तवाचे भान ठेवले पाहिजे



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**आपली मुल शिकली पाहिजेत घडली पाहिजेत हे प्रत्येक पालकाच स्वप्न असतं. पण हे स्वप्न पूर्णत्वास जात असताना मुलांवर अपेक्षेचा बोजा पडु नये.म्हणून अपेक्षा आणि वास्तव याचा योग्य ताळमेळ पालकांना घालता आला पाहिजे.वेळ बदलली त्या सोबत काळ आणि परस्थिती देखिल बदलली आहे.कुटुंब, समाज ,शाळा, महाविद्यालय,कॉलेज,या मध्ये आजपासून पंचवीस तीस वर्षे पुर्व असणारी शिस्त आज पुर्णपणे लोप पावत चालली आहे.हे वास्तव नाकारता येणार नाही.मुलांच्या मध्ये प्रचंड , चंगळवाद,आळस, मान अपमान सहन न होण्याची वृत्ती.वाढली आहे तर गैरशिस्तीने थैमान घातलं आहे. हाताबाहेर जाणारी मुलं हि सध्याच्या काळातील पालकांची सगळ्यात मोठी डोकेदुखी ठरत आहे.**

हे पुर्ण पणे सत्य नाही वाटलं तरी असत्य तर नक्कीच नाही. या दिशेने मार्गावर असणारी तरूणाई हाताळणं पालकांच्या समोर आव्हान निर्माण करणार आहे.सध्याच्या काळा आणि आपण जेव्हा लहान वयात होत.त्यावेळीचा कालावधी या मध्ये खुप मोठा क्रांतिकारी बदल झाला आहे.आपण त्यावेळी जे पाहिलं अनुभवलं ते हल्लीच्या मुलांच्या बाबतीत लागु होऊ शकत नाही. आपल्या मुलांना ज्या परिस्थितीतून आपण आलो त्या परस्थिती सोबत जुळतमिळत घेत घडविण्यासाठी प्रयत्न केला तर तो प्रयत्न थोडा अडचणी चा ठरेल.म्हणून मुलांना पचेल असा नवीन सुवर्ण मध्य काढून पालकांना मुलांच्या बाबतीत निर्णय घ्यावे लागतील. पालकांना एक पाऊल माघर घेऊन मुलांशी जुळवून घेऊन त्यांचं हित करणं आवश्यक आहे. एकंदरीत आपला कालखंड तेव्हाची कौटुंबिक परस्थिती , आर्थिक अडचणी , कौटुंबिक शिस्त , वातावरण कमालीच वेगळ होतं.आपण ज्या परिस्थितीतून इथपर्यंत पोहोचलो.ती परिस्थिती हि प्रत्येकाच्या दृष्टीने एक इतिहास आहे.आणि त्या काळी असणारी प्रत्येक बाबीची दुर्मिळता , कुटुंबातील वेगवेगळ्या सदस्यांच वैचारिक मानसिक दडपण , आदरभाव ,शिस्त ह्या सगळ्या बाबी खुप आत्मियतेने कौटुंबिक जिव्हाळा,जपला जयाचा ,मान सन्मान अपमान याच काही वाटत नव्हत कोण काय काय बोलायचं,याच फार काही वाटतं नव्हतं. अभ्यास नाही केला तर गुरूजी सकट घरातील गावातील कोणीही बोले ,वेळ प्रसंगी मार दिला जाई.पण योग्य अभ्यास करण्यासाठी कडक शिस्त होती शाळेत छडी होती.तर घरात प्रश्नांची सरबत्ती असयाची अनेक छोटी मोठी कामे करून शिक्षणावर लक्ष केंद्रित करावं लागत असायच. एकत्र कुटुंब पद्धती असायची आपल्या वडीलांचा जन्म कोणत्या प्राधान्य क्रमाने झाला त्यानुसार अनेक बाबी त्या त्या पद्धतीने मिळायच्या अगदी आज कुठेही घरोघरी असणारी चपाती पोळी वर्षातुन कधी तरी एखाद्या सणावाराला वाटयाला येत असे.कपडे तर विचारता सोय नाही.चप्पल असली तर नशिब अगदी ठिगळा ठिगळाचे कापडे घालून शाळा गाठावी लागत असे.आजच्या मुलांना हे ऐकुन सुद्धा पचणार नाही.एवढ्या बिकट परिस्थिती मधुन मार्ग काढत आपण इथपर्यंत पोहोचलो आहेत.मग पालकांची एवढीच माफक इच्छा असते.कि आपणं जे भोगल अनुभवलं ते दुःख आपल्या मुलांच्या वाट्याला येऊ नये . त्याला सगळ्या सुविधा उपलब्ध आहेत.त्याने आपल्या पेक्षा जास्त प्रगती केली पाहिजे.हि पालकांची इच्छा काही गैर नाही पण ती योग्य पद्धतीने पाल्यांच्या पचनी पडेल अशा पद्धतीने हताळल पाहिजे. काही लोक तर स्वतः रोजगार हमी वर काम करत शिकले . म्हणजे किती भयानक परिस्थिती मधुन आपण इथ पर्यंत पोहचलो आहेत. याची जाणीव पालकांना क्षणोक्षणी होते.या जाणिवेतून पालक मुलांच्या संदर्भात जागरूक असतात.पण अडचण हि आहे कि आपलं दुःख हे मुलांना कळत नाही जाणवतं नाही. मग आपण आठवतो ती आपण अनुभवलेली त्या काळीची ती शिस्त आणि आजची वाढणारी गैर शिस्त त्याकाळी असणारी शिस्त , जिव्हाळा त्या विरूद्ध बंड करण्याची त्याकाळी कल्पना सुद्धा सुचत नव्हती. त्याकाळी असं धरिष्ठय कोणीही करू शकत नव्हतं पण आता तसं राहिलं नाही.शिस्त ऐकण्यासाठी जड आहे.अनुकरण कधी होणार आणि मग पालकांची चिंता तर स्वभाविक आहे.मग सध्याच्या मुलांचा स्वभाव बदलु शकत नाही.आणि पालकांचाही नक्कीच नाही मग या मध्ये वैचारिक मत भेद हे मन भेदा पर्यंत पोहचण्या अगोदरच पालकांनी आपली रणनिती बदलून मधला मार्ग काढावा दोन पावलं मागे यावं आणि मुलांच्या भविष्याची चिंता योग्य आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत) आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# रक्तदान करूया प्रेमाची नाती जोडूया : डॉ. शरद जुमडे

## आयडीए बुलढाणाकडून प्रजासत्ताकदिनी रक्तदान शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** प्रजासत्ताक दिनी आय डी ए बुलढाणा कडून आयोजित रक्तदान शिबिरात रक्तदान करून देश हिताच्या कार्यात सहभागी होता येईल कारण रक्तदान ही एक प्रकारची राष्ट्रसेवाच आहे. रक्तदान हे श्रेष्ठदान आहे. रक्तदानामुळे लाखों लोकांना जीवनदान मिळते, त्यामुळे रक्तदान हे जीवनदान असे म्हणणे आता वागवे ठरणार नाही. रक्तदान हे आरोग्याच्या दृष्टीने नक्की कसे फायदेशीर ठरते ते घ्या जाणून. रक्तदान केल्याने हृदयापर्यंत रक्तप्रवाह योग्य राहून हृदयरोगाचा धोका राहात नाही.
पण रक्तदान केल्याने वजन कमी करण्यासह सहनशक्तीही वाढते. ब्लड सेल्सने अधिक उत्पादन होऊन आरोग्याला फायदारक्तदान केल्यानंतर रक्तातील प्लाज्मामध्ये ल्युकोसाईट्सची वृद्धी होते. ल्युकोसाईट्स आपल्या प्रतिकारशक्तीसाठी कार्यरत असतात मिळतो. नियमित रक्तदान केल्याने शरीरातील IRON LEVEL नियंत्रित राहाते.रक्तात लोह अधिक प्रमाणात झाल्यास



रक्तदान हा लोह कमी करण्याचा चांगला पर्याय आहे. म्हणजेच रक्तात लोह अधिक प्रमाणात साठू नये म्हणून रक्तदान करावे. जेव्हा तुम्ही रक्तदान करता तेव्हा तुम्हाला एक वेगळीच सुखद अनुभूती येते. आपल्या रक्तामुळे कोणाचे तरी प्राण वाचले आहेत ही भावनाच तुम्हाला आनंद देऊन जाते.रक्तदान करण्यासाठी महत्वाच्या गोष्टी - रक्तदान करणाऱ्याचं वय 18 ते 65 यादरम्यान असायला हवं. रक्तदान करणाऱ्याचं वय 45 किलोपेक्षा जास्त असावं. प्रत्येकवेळी रक्तदान करताना तीन महिन्यांचं अंतर असावे. 26 जानेवारी रोजी दहा ते एक वाजताच्या दरम्यान रक्तदान शिबिर बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालय येथे आयोजित करण्यात आले आहे तरी या शिबिरात मोठ्या संख्येने उपस्थित राहून रक्तदान करण्याचे आवाहन इंडियन डेंटल असोसिएशन बुलढाणा शाखेचे अध्यक्ष डॉक्टर शरद जुमडे आणि सचिव डॉक्टर सचिन किनगे व इतर पदाधिकाऱ्यांनी केले आहे.



## खा. चिखलीकर यांच्या वतीने धर्माबाद येथे झेंडे, दिवे वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** नांदेड जिल्ह्याचे लोकप्रियौ खासदार प्रतापरावजी पाटील चिखलीकर यांच्या वतीने धर्माबाद तालुक्यातील रामभक्तांना झेंडे व दिवे वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला अयोध्या येथे श्रीरामलाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त नांदेड जिल्ह्याचे लोकप्रिय खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांनी नांदेड जिल्ह्यामध्ये तिने लक्ष झेंडे व दिवे वाटपाचा कार्यक्रम हाती घेतला होता याचाच एक भाग म्हणून धर्माबाद तालुक्यात व शहरांमध्ये खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वतीने झेंडे व दिवे वाटपाचा कार्यक्रम करण्यात आला यावेळी शिवराज पाटील गाडीवान यांच्या हस्ते धर्माबाद मधील प्रमुख पत्रकार व्यापारी व्यावसायिक बंधू मेडिकल स्टोअर्स यांना प्रातिनिधीक स्वरूपामध्ये दिवे व झेंडे वाटप करण्यात आले.

## पळवलेल्या बाळाचा चार तासात शोध

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** पंचवटीतील श्री काळाराम मंदिरात सोमवारी दर्शनासाठी रामभक्तांमुळे झालेल्या गर्दीचा फायदा घेत संशयित महिलेने चोरलेले बाळ पोलिसांच्या तत्परतेने तीन ते चार तासांच्या आत परत मिळाले. या प्रकरणात एका भिकारी महिलेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अयोध्येतील सोहळ्यामुळे सोमवारी शहरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून पोलिसांनी बंदोबस्त ठेवला होता.
पंचवटीतील काळाराम मंदिरात भाविकांची दर्शनासाठी होणारी गर्दी लक्षात घेता गोदाकाठ परिसरासह अन्य ठिकाणी गस्त वाढवण्यात आली होती.
भद्रकाली पोलीस ठाण्याचे सहायक निरीक्षक सत्यवान पवार हे पथकासह गोदाकाठ परिसरात गस्त घालत असताना त्यांना पिंपळपार चौकात भिकारी महिला एक वर्षाच्या लहान बाळाला घेऊन आडोशाला भीक मागताना दिसली. महिला आणि तिच्याजवळील बाळ यांच्यात कोणतेही साम्य आढळत नसल्याने पोलिसांना संशय आला. गुन्हे शोध पथकाने महिलेकडे चौकशी केली असता ती उडवाउडवीची उत्तरे देऊ लागली. तिच्या जवळचे बाळ हे मुलगा असल्याचे सांगितले. परंतु, पथकाने बाळाला ताब्यात घेऊन पाहणी केली असता बाळ मुलगी असल्याचे लक्षात आले. त्यामुळे पोलिसांनी खास आपल्या खाक्यानुसार चौकशी करताच महिलेने रामकुंड परिसरातून सायंकाळी सहाच्या सुमारास बाळ पळवल्याची कबुली दिली. दरम्यान, बाळ हरवल्याची तक्रार पालकांनी पंचवटी पोलीस ठाण्यात केली होती. भद्रकाली पोलिसांनी पंचवटी पोलीस ठाण्यात विचारणा केली असता त्यांनीही दुजोरा दिला. महिला आणि बाळ यांना पंचवटी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले.



## गीताईमध्ये 'कवी आपल्या भेटीला 'कार्यक्रमाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्ताने गिताई इन्सीट्यूट ऑफ मॅनेजमेंट आयोजीत कार्यक्रमात " कवी आपल्या भेटीला " या उपक्रमातून प्रसिध्द ग्रामीण साहित्यिक अय्युब पठाण लोहगांवकर यांनी मराठी भाषेचे महत्व सांगून एकपात्री कार्यक्रम सादर केला. त्यामध्ये भारूडे, गोळणी, पोवाडे, देशभक्तीपर गीते, विनोदी नकला आणि काव्य गायन करुन उपस्थित विद्यार्थी यांना मंत्रमुग्ध केले. या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष गिताई इन्सीटयूट ऑफ मॅनेजमेन्टचे संचालक किर्तिकुमार एखंडे हे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यिक अय्युब पठाण लोहगावंकर होते. यावेळी प्रा. राहूल पाटील, प्रा. शारदा कोकाटे, प्रा. जया थोरात आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु. सुकन्या म्हारोळकर हीने केले तर आभार प्रदर्शन मिनाक्षी रासकर हीने मानले.

## ट्रकची दुचाकीला जोरदार धडक

आधुनिक केसरी न्यूज

**सागर झनके**

**जळगाव जा :** शहरातील जळगाव - नांदुरा रोडलगत असलेल्या महाराष्ट्र बँकेसमोर ट्रकने दुचाकीला दिलेल्या धडकेत एक इसम जागीच ठार तर एक इसम गंभीर जखमी. याबाबत मिळालेल्या प्राप्त माहितीनुसार २२ जानेवारीला दुपारच्या वेळेस जळगाव शहरातील महाराष्ट्र बँकेसमोर एम.एच.२८-७८८९ क्रमांक असलेल्या ट्रक चालकाने दुचाकीला जोरदार धडक दिली.यामध्ये भिंगारा येथील दुचाकीस्वार जागीच ठार झाला तर भेंडवळ येथील वासुदेव सोनोने वय ६२ वर्ष हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जळगाव ग्रामीण रुग्णालयात प्राथमिक उपचार करून खामगाव येथे रेफर करण्यात आले आहे. सदर ट्रक पोलीस स्टेशन जळगाव जामोद येथे जमा करण्यात आला आहे.





## माहूर येथे 'काहूर'या कविता संग्रहाचे प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** मूळच्या धाराशिव जिल्ह्यातील प्रा.माया सूर्यकांत मुळे यांनी लिहिलेल्या 'काहूर' या कविता संग्रहाचे प्रकाशन नुकतेच माहूर येथे पार पडले. काहूर या कवितासंग्रहाचे प्रकाशन अग्निपंख शैक्षणिक समुहाद्वारे करण्यात आले. प्रसंगी माजी शिक्षणाधिकारी प्रमोद सूर्यवंशी, प्राचार्य डॉ. प्रशांत गावंडे- जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यवतमाळ, मा. राजू मुधोळकर- गट शिक्षणाधिकारी माहूर, मा. धम्मरत्न वायवळ- ज्येष्ठ अधिव्याख्याता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यवतमाळ, मा. सतीश दर्शनवाड- गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती उमरखेड, सामाजिक कार्यकर्त्या सौ. मंजुषा ढाकरे मॅडम, राज्य संघटक अर्चना मेहरे मॅडम, राज्य समन्वयक गजानन गोपेवाड सर व्यासपीठावर उपस्थित होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. डॉ. श्रीकृष्ण पांचाळ- जिल्हाधिकारी जालना म्हणून लाभले.
स्वर्गीय किसन मारोती गोपेवाड यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दिला जाणारा सन्मान ही याच कार्यक्रमात प्रा. माया सूर्यकांत मुळे यांना देण्यात आला. या निमित्ताने शिक्षण व साहित्यिक क्षेत्रातून मॅडम चे कौतुक होत आहे.

## रामराज्य म्हणजे धर्माचे राज्य : ढोक महाराज

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** संपूर्ण जगतात आदर्श रामराज्य निर्माण व्हावे म्हणून भारताने अयोध्येत मानवतेचा जगत पिता प्रभू रामचंद्र यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करून जगताला धर्माचे राज्य करण्याचा प्रभू रामचंद्रचा आदर्श राज्य चालविण्याचा जणू सल्ला दिला आहे असे वक्तव्य रामायणाचे गाढे अभ्यासक रामायणाचार्य हभप रामराव ढोक महाराज यांनी सोमवार(ता,२२) रोजी येथील जि,प,प्रशालेच्या मैदानावर सोमवार पासून आरंभ झालेल्या रामकथेत दिला,माजी आमदार भाऊसाहेब पा,चिकटगावकर यांनी स्व, बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मरणार्थ गत वर्षीच २२जानेवारी,२०२४ही तारीख रामकथे साठी निश्चित केली होती,हा योगायोग की याच तारखेला अयोध्येत प्रभू रामचंद्र यांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना झाली,प्रभू रामचंद्रांच्या आगमनार्थ आज संपूर्ण देशात दिवाळी साजरी होत आहे,हा आम्हा भारतीयांसाठी गौरव आहे,महाराज पुढे म्हणाले की,रामराज्य म्हणजे धर्म राज्य होय, माणसांनी, माणसांशी, माणसासारखे वागावे हा धर्म होय आणि अशा मानवीय मूल्यांच्या धर्माचा आरंभ घरापासून व्हावा तरच पुन्हा रामराज्य प्रस्थापित होईल असे ही महाराज पुढे म्हणाले, आरंभी आयोजक माजी आ,भाऊसाहेब पा,चिकटगावकर, सौ. विजया चिकटगावकर,अजय पा,चिकटगावकर, यांनी प्रभू रामचंद्र ,रामभक्त हनुमान यांच्या व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमा पूजन केले,व ढोक महाराज यांचेही पूजन केले,तीन तास चाललेल्या कथेचे पहिले पुष्प ढोक महाराज गुंफताना पुढे म्हणाले की,देशात सजन्नच्या संघटनेचा अभाव असल्याने ,समाज स्थिती अस्थिर आहे,प्रभू रामचंद्र अयोध्येत विराजमान झाल्याने आता सजन्न संघटित होतील व देशात रामराज्य येईल असेही ते पुढे म्हणाले, या प्रसंगी माजी जि.प. सभापती वैजापूरः प्रसंगी माजीजि.प.सभापती अविनाश पा. गलांडे,मनाजी पा, मिसाळ, भाऊसाहेब पा. गलांडे, अजय पा. चिकटगावकर,साईनाथ मतसागर,हभप जगताप महाराज,धोंडीरामसिंह राजपूत,प्रशांत शिंदे,देविदास वाणी,यांच्या सह ग्रामीण भागातील नागरिक पुरुष-महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या, शेवटी आरती समयी मेणबत्या प्रज्वलित करून दीपोत्सव साजरा करण्यात आला,मंगळवार पासून दररोज कथेची वेळ सायंकाळी ६ ते रात्री९ ठेवण्यात आलेली आहे,

# बाबा देशमाने यांना त्र्यंबक आसरडोहकर प्रतिष्ठानचा उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** ग्रामीण भागात पत्रकारिता करणे अवघड होते. मात्र हे अडथळे झुगारून कै. त्र्यंबक आसरडोहकरांनी ग्रामीण भागातील पत्रकारितेचे आव्हान स्वीकारले, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार शामसुंदर सोन्नर यांनी येथे केले.

येथील (कै) त्र्यंबक आसरडोहकर स्मृती प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा यंदाचा "उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार" आरोग्यदूतचे संपादक बाबा देशमाने यांना प्रदान करण्यात आला. त्या प्रसंगी सोन्नर महाराज बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार तथा किसानपूत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब हे होते. स्वाराती मधील मेडीसीन विभाग प्रमुख डॉ. सिध्देश्वर बिराजदार, सत्कारमुर्ती बाबा देशमाने, रेखा आसरडोहकर यांची प्रमुख उपस्थिती होती. शेतकऱ्यांच्या बायकांची वेदना शहरी भागातील पत्रकारांनी जाणून घेणे गरजेचे आहे. त्या टेबलावर बसून समजणार नाहीत, अशी खंतही सोन्नर यांनी व्यक्त केली. अमर हबीब म्हणाले, की आसरडोहकर यांनी सुरू केलेल्या, जागल या अंकाचे मी पत्रकारिताचे धडे गिरवले आहेत, असे सांगून त्यांनी हातची नोकरी सोडून पत्रकारितेसाठी ध्येयवेडे झाले होते. त्याकाळी मराठवाडयतील ग्रामीण सकस लेखन फक्त आसरडोहकर यांनी केले. त्यांना सुक्ष्म दृष्टी होती आणि इतरांशी पंगा घेण्याची त्यांची हिंमत होती, त्यांचे व्यक्तिमत्त्व जिंदा दिल होते. सन्मानमूर्ती बाबा देशमाने यांनी गोव्यात पत्रकारिता केली, हे बीड जिल्ह्यासाठी भूषणावह आहे, असेही त्यांनी सांगितले. डॉ. सिध्देश्वर बिराजदार यांनीही मनोगत व्यक्त केले. आरोग्यदूतची सकारात्मक पत्रकारिता समाजासाठी उपयोगी आहे. त्याची धुरा बाबा देशमाने समर्थपणे चालवत आहेत, असे बिराजदार यांनी सांगितले. प्रास्ताविक प्रा. रोहीनी देशमुख यांनी केले. सुत्रसंचलन गोविंद केंद्रे यांनी केले. पत्रकार किरण आसरडोहकर यांनी आभार मानले. यावेळी कार्यक्रमास प्रसिद्ध पखवाजवादक उध्दव आपेगावकर, माधव बागवे, डॉ. सुरेश अरसुडे, प्रा. गोरख शेंद्रे, पत्रकार भगीरथ तोडकरी, दीपक सांगळे, रमेश तिडके, विद्याधर पांडे, विराट गुरूजी, प्रा. बरूरे, प्रा. अलका तडकरकर, सुनिता यात्रेला, सुरेखा सिरसट, उदय आसरडोहकर, सुदर्शन रापतवार, दत्ता अंबेकर, संजीवनी देशमुख, सुधाकर तट आदींची उपस्थिती होती.

**अंबाजोगाईकरांनी केलेला सन्मान प्रेरणा देणारा :** सन्मानमूर्ती बाबा देशमाने म्हणाले, की चोखंदळ असलेल्या अंबाजोगाईकरांनी दिलेला पुरस्कार मला सतत प्रेरणा देणारा आहे. माझ्यासाठी घरचा सन्मान मोलाचा वाटतो. आरोग्यदूतमधून मी अनेक आरोग्याच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्नशील राहील, असा निर्धारही बाबा देशमाने यांनी व्यक्त केला.






# सार्वजनिक वाचनालयासमोर रेड्डी कंपनी जाळते कचरा

## रेड्डी कंपनीवर कारवाई करा : मनीष नरवडे यांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज



**सुधाकर जेठे**

**छत्रपती संभाजीनगर :** संभाजी कॉलनीतील सिडकोतील संभाजी कॉलनी या नागरी वसाहतीत मुलांना खेळण्यासाठी असलेली मैदाने व अभ्यास करण्यासाठी असलेले वाचनालय कचरा व टाकाऊ साहित्य पडल्याने गलिच्छ झाली आहेत. प्रशासन याकडे दुर्लक्ष करीत असल्याने मुलांना रस्त्यावर खेळावे लागत आहे.

प्रशासनाने नागरी वसाहत भागात मुलांना खेळण्यासाठी तसेच सार्वजनिक उपक्रमासाठी मैदाने राखीव ठेवली आहेत. परंतू प्रशासनाकडून या मैदानाच्या देखभाल व दुरुस्तीकडे लक्ष दिले जात नाही. लगतचे रहिवाशी मोकळ्या मैदानातील वाचनालयाच्या समोर ओला व सुका कचरा, खरकटे तसेच टाकावू साहित्य टाकत आहेत. शिवाय मोकाट जनावराचाही सतत वावर असतो. त्यामुळे संभाजी कॉलनी व सिडकोतील मैदानाची व वाचनालयाची तसेच व्यायाम शाळेची दुरावस्था झाली. कचऱ्यामुळे दुर्गंधीही पसरली आहे. पर्यायी जागा नसल्याने लहान मुलांना रस्त्यावर किंवा दुर्गंधीचा त्रास सहन करत मैदानात खेळावे लागत आहे. खेळताना दगडामुळे पडून जखमी होत आहेत. येथील नागरिकांकडून मैदान स्वच्छ व देखभालीची मागणी केली जाते. पण प्रशासनाकडून त्याकडे डोळेझाक केली जाते. रेड्डी कंपनीला कचरा संकलन करण्याचे कंत्राट अनेक वर्षापासून दिले आहे. कचरा गाड्या घरापर्यंत येऊन कचरा घेऊन जाणार असा नियम असतानाही गाड्या सरळ रस्त्याने निघून जातात अन् त्यामुळे नागरिक घरातील कचरा रस्त्याच्या कडेला किंवा मोकळ्या मैदानावर टाकून निघून जातात. परंतु जेव्हा घरी ये-जा करताना अनेकदा नाक दाबून प्रवास करावा लागतो, त्यामुळे आरोग्यास धोका निर्माण झाला आहे. औषध फवारणी करणाऱ्याचाही फेरफटका येथे दिसत नाही, त्यामुळे डासाचा त्रास देखील नागरिकांना सहन करावा लागतो. असे विविध प्रश्न नागरिकांचा पाठलाग सोडत नसल्याची स्थिती ताजी असताना त्यातच रेड्डी कंपनीने आणखी भर घातली आहे. रोज रेड्डी कंपनीचे कर्मचारी सार्वजनिक वाचनालया समोर कचरा जाळत असल्याने कचऱ्याच्या त्रासासोबतच धुराचे लोंढे परिसरात वाहत असल्याने अनेकांना श्वसनाचे आजार होत आहे. त्यामुळे मनपा आयुक्तांनी रेड्डी कंपनीचे कंत्राट कायमस्वरूपी बंद करून त्याच्यावर गुन्हा दाखल करावा अशी मागणी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (सचिन खरात) गटाचे मनीष नरवडे यांनी पत्रकारांशी बोलताना केली आहे.



# लव-कुशाच्या जन्मस्थळी 'लोहगडावर' श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** तालुक्यातील लोहगड नांद्रा येथील लोहागड व परिसरातील मंदीरात श्री राम मंदीर लोकार्पण व मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त आनंदोत्सव विविध धार्मिक कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. याठिकाणी असलेल्या पुरातन काळातील महत्त्वाच्या ठिकाणी पूजन करण्यात आले. त्यानंतर राम मंदीरात आरती करण्यात आली व भजनांचा कार्यक्रम पार पडला. तर या सोहळ्यानिमित्त आनंदोत्सव म्हणून महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. परिसरात भाविकांची यावेळी मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# तरुणीचा जळालेला मृतदेह आढळला

आधुनिक केसरी न्यूज

**चिखली :** तालुक्यातील असोला शिवारात 23 जानेवारीच्या सकाळी संतापजनक घटना उघडकीस आली. चिखली ते अंचरवाडी दरम्यान असलेल्या असोला येथील राजवाडा ढाब्याच्या मागील बाजूस एका तरुणीचा अर्धवट जळालेल्या अवस्थेत मृतदेह आढळला. एसपी सुनील कडासने, अप्पर पोलीस अधीक्षक बी बी महामुनी, उपविभागीय पोलिस अधिकारी प्रदीप पाटील, अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार विकास पाटील तातडीने घटनास्थळी दाखल झाले. दरम्यान मृतक तरुणी अनोळखी असल्याने तिची ओळख पटविण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे. मृतक तरुणीचे वय अंदाजे 19 ते 25 या वयोगटातील असावे असा अंदाज आहे. तरुणीचा आधी गळा आवळण्यात आला, डोक्यात मागील बाजूला दगडाचा वार करण्यात आला, आणि तरुणीच्या अंगातील कपडे तिच्या चेहऱ्यावर टाकून जाळण्यात आले असे प्रथमदर्शनी दिसत आहे. तरुणीचा मृतदेह नग्न अवस्थेत आहे. तिला मारण्याआधी बलात्कार केला असावा असा संशय पोलिसांनी व्यक्त केला. दरम्यान घटनास्थळी तूप आणि दिव्याची वात देखील सापडली आहे. त्यामुळे हे सगळे प्रकरण चक्रावून टाकणारे आहे. घटनास्थळाकडे जाणाऱ्या रस्त्यात एक नारळ देखील सापडल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. तरुणीच्या गळ्यात मंगळसूत्र आढळल्याने ती विवाहिता असावी, तिच्या उजव्या हातात केशरी धागा बांधलेला आहे तर त्याच हातावर दिलचे चिन्ह असल्याचे आढळून आले.

# शरद पवार निष्ठावंतांनी कंबर कसली, राष्ट्रवादीची ताकद वेगाने वाढत आहे

## जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**वसंत पाटील**

**वाशिम :** राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय नेते शरदचंद्र पवार यांच्याशी निष्ठावंत असलेल्या कार्यकर्त्यांनी कंबर कसल्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसची ताकद वेगाने वाढत आहे. असे प्रतिपादन राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बाबाराव पाटील खडसे यांनी केले आहे. भविष्यात येपेक्षाही अधिक ताकद वाढविण्याचे आवाहन देखील त्यांनी यावेळी केले आहे. पक्षनिरीक्षक प्रा. विश्वनाथ कांबळे यांनी पक्षकार्याची आढावा बैठक घेतली सदर बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. राष्ट्रीय नेते शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांची ताकद वाढत आहे आणि यापेक्षाही जास्त वेगाने ही ताकद वाढविण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे वाशीम जिल्हा अध्यक्ष बाबाराव खडसे पाटील यांनी केले. वाशिम जिल्हा पक्षनिरीक्षक प्राध्यापक विश्वनाथ कांबळे यांनी जिल्ह्यातील पक्षकार्याचा आढावा घेतला. जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक राष्ट्रीय नेते शरदचंद्र पवार ह्यांचेवर निष्ठा असणारे राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बाबाराव खडसे पाटील यांचे अध्यक्षतेखाली वाशिम मध्ये संपन्न झाली. यावेळी माजी आमदार अनंतकुमार पाटील, कारंजा मानोरा नेते सुनील पाटील, माजी जि.प. सभापती भोजराज चव्हाण, डॉक्टर श्याम जाधव, वाशीम पं.स.चे माजी सभापती व रा. कां. पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष डाडॉ. भगवानराव गोटे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या महिला आघाडी जिल्हाध्यक्ष वैशाली मेश्राम यांची मंचावर विशेष उपस्थिती होती. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये झालेल्या फाटाफुटी नंतर शरद पवार समर्पित राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची संघटन शक्ती वाढत असल्याचे दिसून येत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवा नेते रोहित पवार यांचा वाशिम जिल्ह्यातून झालेल्या दौऱ्यानंतर शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मोठी ताकद मिळाली आहे. मुलुख मैदान तोफ प्रचंड संघटन शक्ती आणि आंदोलनातील लढवायला नेतृत्व असलेले अनुभवी प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचे धनी माजी आमदार अनंत कुमार पाटील यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला सोबतच माजी सभापती भोजराज चव्हाण, डॉक्टर श्याम जाधव यांचे सह शेकडो कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला. या मंडळींनी विद्यमान जिल्हा परिषद सदस्य व माजी जिल्हा परिषद अध्यक्ष अरविंद पाटील इंगोले यांच्या पाठोपाठ शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात दिग्गजांनी प्रवेश केल्यामुळे वाशिम जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस



पक्षाची ताकद वाढली आहे त्याचप्रमाणे या पाठोपाठ अजूनही ताकद वाढविण्यासाठी तळागाळातील शेवटच्या घटकापर्यंत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य पोहोचविण्यासाठी आणि त्यामधून प्रत्येक मतदान केंद्रावर कार्यक्षम लोकाभिमुख व्यक्ती बूथ प्रमुख म्हणून निश्चित करण्यासाठी पावले उचलण्याचे आवाहन करण्यात आले, तालुकास्तरावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मेळाव्यांचे आयोजन करण्याबाबतचे नियोजन करण्यात आले, पक्ष निरीक्षक प्राध्यापक विश्वनाथ कांबळे यांनी तालुका निहाय आणि विविध विभागांच्या अध्यक्ष कडून त्यांच्या कार्याचा आढावा घेतला. आणि पक्ष वाढवणे बाबत सूचना वजा मार्गदर्शन केले. यावेळी जिल्हाध्यक्ष बाबाराव खडसे पाटील यांनीरा कां चे संस्थापक अध्यक्ष शरद पवारांच्या वर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष मध्ये येणाऱ्यांची संख्या वाढत आहे. त्याप्रमाणे दिग्गज मंडळी पक्षात येत आहेत. तेव्हा यापेक्षाही जास्त ताकद वाढविण्याचे आवाहन त्यांनी केले. त्याचप्रमाणे लवकरच महाविकास आघाडीतील घटक पक्षांची एक मोठी सभा सर्वांच्या सहकायनि आयोजन बाबतचे संकेत त्यांनी या सभेत दिले यावेळी माजी आमदार अनंतकुमार पाटील यांनी लढवय्या शैलीतील भाषणांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यात चैतन्य निर्माण केले. यावेळी सूत्रसंचालन तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटन वाढीबाबत मार्गदर्शन ज्येष्ठ नेते सुनील पाटील यांनी केले. माजी आमदार स्व. वि.को. शिंदे यांचे मुलगे मालेगाव कृषि ऊत्पन्न बाजार समीती संचालक राजकुमार शिंदे, राष्ट्रवादी युवक काँग्रेस जिल्हाध्यक्ष अनंत काळे, व प्रा. नंदकिशोर गायकवाड, कैलासराव खानझोडे, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष डॉक्टर रमेश चंदनशिव, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हाध्यक्ष ईम्रानभाई फकीरावाले, कारंजाचे सुभानभाई कामनावाले, माजी पं.स. सदस्य डॉ. गजानन बाजड, डॉ. माधव जाधव, ओबीसी विभाग जिल्हाध्यक्ष मनिष चिपडे सह तालुकाध्यक्षमधे मालेगाव तालुका खवीस अध्यक्ष तथा रा.कां. तालुकाध्यक्ष भगवानराव शिंदे, वाशिम तालुका अध्यक्ष रमेशभाऊ गोटे, मंगरूळपीर तालुकाध्यक्ष राजेश टोपले, रिसोड तालुकाध्यक्ष गजाननराव सरनाईक, मानोरा तालुकाध्यक्ष काशीराम राठोड, रा. यु.कां. तालुकाध्यक्ष तथा उद्योजक विचारवंत माधवराव शेवाळे, मं. पीर तालुकाध्यक्ष, कारंजा तालुकाध्यक्ष, सामाजीक न्याय विभागाच्या महीला आघाडी जिल्हाध्यक्ष किरणताई इंगोले, जिल्हाकार्याध्यक्ष धम्म प्रकाश गायकवाड, वाशीम ता. अध्यक्ष गौतम कांबळे, मानोरा तालुकाध्यक्ष निलेश राठोड, मानोरा शहर अध्यक्ष दिपक, भगत ह्याचप्रकारे विविध विभागांच्या पदाधिकारी व कार्यकर्ते मंडळींची उपस्थिती होती.

# वडोद बाजार येथे भक्तिमय वातावरणात प्रभू श्रीरामचंद्राची मिरवणूक, राम मंदिराचे भूमिपूजन

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** अयोध्यामध्ये प्रभू श्रीराम चंद्राच्या प्राणप्रतिष्ठेचा कार्यक्रम संपन्न झाला त्याप्रमाणेच वडोद बाजार येथेही दोन दिवस अगोदर पासून गावातील सर्व मंदिराची स्वच्छता करण्यात आली होती वडोद बाजार येथील फुलावर प्रभू श्रीरामाच्या साठी भव्य स्टेज उभारण्यात आला होता या स्टेज भोवती रांगोळीची काढण्यात आली होती तर फुलावर कमान उभारण्यात आल्या होत्या रविवारपासूनच भक्तिमय वातावरणात सुरुवात झाली होती तर दक्षिण मुखी मारोती मंदिरावर सजावट फुलांनी करण्यात आली होती सोमवारी पहाटे आठ वाजता प्रभू श्रीराम चंद्राच्या मूर्तीची पूजन अभिषेक व महाआरती करण्यात आली यावेळी 21 जोडप्यांनी यावेळी अभिषेक आरती करण्यात आली उपस्थिती दर्शवली होती तर गावातील महिला पुरुष मोठ्या संख्येने महाआरती अभिषेक साठी उपस्थित होते. अयोध्या येथील प्रभू श्रीराम चंद्राच्या प्राणप्रतिष्ठेचे लाईव्ह स्क्रीन द्वारे दाखवण्यात आले यासाठी भाविक मोठ्या संख्येने या आयोध्या येथील सोहळा पाहत होते तर दुपारी चार वाजता वाढदिवस येथे प्रभू श्रीरामचंद्राच्या मंदिराचे भूमिपूजन करण्यात आले यावेळी वडद बाजार ग्रामपंचायत उपसरपंच गोपाळ वाघ, चेअमन कडूबा म्हस्के,ग्रामपंचायत सदस्य शिवराम मस्के ,बाबुराव मंदाडे शुभम गंगावणे, रजिक शेख, गोविंद पाडेजी, साबेर शेख,काकाजी कोलते,



पांडूरंग वाघ, पांडूरंग जाधव रामकिसन वाघ, पर्फुल शिंदे,, सोसायटी सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, वडोद खुर्द, भाल गाव गावांतील नागरिक ग्रामस्थ उपस्थित होते.

त्यानंतर प्रभू श्रीरामचंद्राची गावात भव्य मिरवणूक करण्यात आली यावेळी मिरवणुकीत बाजारातील श्री सरस्वती भुवन शाळेतील विद्यार्थिनींनी लेझीम घेऊन या मिरवणुकीत सहभाग नोंदवला तर गाव येथील महिलांनी मोठ्या संख्येने या मिरवणुकीत सहभाग नोंदला होता या मिरवणुकीत प्रभू श्रीरामचंद्र लक्ष्मण सीता यांचे वेशभूषा धारण करण्यात आली होती तर युवकांसाठी या मिरवणुकीत डीजेच्या माध्यमातून करण्यात आली होती जवळपास एक किलोमीटर अंतरावर असलेल्या मिरवणुकीत गावातील महिला पुरुष युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते गुलालाची उद्घाटन करीत प्रभू श्रीरामचंद्राचा जय घोष करत मिरवणुकीस वडोद वस्ती येथून सुरवात करण्यात आली गावातील मारुती मंदिरापासून गणपती मंदिरापासून गावात भव्य मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकीत गावतील सर्वच महिला पुरुष व युवक भाविक मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते या मिरवणुकीच्या समारोपणानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम भाविकांनी यावेळी महाप्रसादाचा लाभ घेतला माझ्या यशस्वीतेसाठी वडगाव येथील युवकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेऊन परिश्रम घेतले गावातील पक्षभेद विसरून गावातील नागरिक या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी झाले होते रात्री मिरवणुक सुरूच होती.

# फुलंब्रीत राममूर्तीची स्थापना; रामभक्तांत उत्साह

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** आयोध्या येथे स्थापन झालेल्या राम मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेचे पार्श्वभूमीवर फुलंब्री येथील मारुती मंदिरात राम लक्ष्मण सीतेच्या मूर्तीची स्थापना सोमवार रोजी करण्यात आली. मूर्ती स्थापनेच्या निमित्ताने शहरातून शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रा दरम्यान २५ बैलगाड्यांचा समावेश होता बैलपोळ्याला ज्याप्रमाणे बैल सजनतेत त्याप्रमाणे बैलगाड्या सजवण्यात आल्या होत्या यावेळी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी देखील उपस्थित राहून बैलगाडी चालून या शोभयात्रे सहभाग नोंदवला यावेळी भाजपाचे जिल्हाध्यक्ष सुहास शिरसाठ यांची प्रमुख उपस्थिती होती. त्याचप्रमाणे विद्यार्थिनी लेझीम खेळत हा आनंद महोत्सव रंगत आणली टाळ मृदंगाच्या गजरात परिसर मधून गेला होता ठिकठिकाणी राम नामाचा गजर होत होता यावेळी भाविकांच्या वतीने फुलांचा उधळण करण्यात येत होती त्याचप्रमाणे राम मंदिर परिसरात डीजेच्या तालावर युवक आणि ठेका धरला होता या शोभयात्रेचा समारोप बाजार गल्ली परिसरातील मारुती मंदिर रामाची मूर्ती स्थापना करून करण्यात आली. यावेळी जय श्रीराम या जय घोषाने परिसरात दुमदुमून गेला होता. राम मंदिर येथे जनता पक्षाच्या वतीने प्रसादाचे वाटप करण्यात आले यावेळी आयोध्या येथील रामलला स्थापनेच्या कार्यक्रमाचे एलईच्या माध्यमातून थेट प्रसारण दाखवण्यात आले होते. यावेळी भाजपा कार्यकर्ते तसेच रामभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# भारत जोडो न्याय यात्रेवर हल्ला करणाऱ्यांना अटक करा : काँग्रेसचे तहसीलदारांना निवेदन

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे नेते तथा खासदार राहुलजी गांधी यांच्या भारत जोडो न्याय यात्रेवर भाजप प्रेरणीत गुंडांनी हल्ल्या केल्याच्या निषेधार्थ लोणार तालुका काँग्रेस कमिटीचे तालुका अध्यक्ष राजेश मापारी मापारी, शहराध्यक्ष शेख समद शेख अहमद यांच्या नेतृत्वात आज लोणार तहसीलच्या नायब तहसीलदार परडीकर मॅडम यांना निवेदन देण्यात आले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष आ. नानाभाऊ पटोले यांच्या आदेशानुसार व जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तथा माजी आमदार राहुलभाउ बोंद्रे यांच्या सूचनेनुसार अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे नेते तथा खासदार राहुल गांधीजी यांनी भारत जोडो न्याय यात्रा देशातील सर्व सामान्य गरीब, पिडीत, वंचित, महिला, युवक व विद्यार्थी यांना न्याय मिळवून देण्यासाठी नेते खा. राहुलजी गांधी यांनी १४ जानेवारी २०२४ पासुन भारत जोडो यात्रेला सुरूवात केल्याचे सर्वश्रुत आहे. मणिपुर येथुन निघालेली ही यात्रा नागालॅंड, अरुणाचल ह्या राज्यातील प्रवास पुर्ण करून आसाम राज्यात दाखल झालेली आहे. यात्रेला मिळणारा प्रचंड प्रतिसाद बघता, भाजपा प्रणित आसाम राज्यात काही गुंड प्रवृत्तीच्या कार्यकर्त्यांनी यात्रेत अडथळे आणण्याचा प्रयत्न चालविलेला आहे. त्यांच्या गुंडांनी भारत जोडो न्याय यात्रेवर हल्ला केला. खा. राहुलजी यांची बस अडवण्याचा प्रयत्न केला. भाजपच्या या गुंडांनी केलेल्या हल्ल्यात आसाम काँग्रेसचे अध्यक्ष भुपेन बोरा यांच्यासह अनेक काँग्रेस कार्यकर्ते जखमी झाले आहेत. सर्वसामान्य जनतेच्या न्याय हक्कासाठी निघालेल्या भारत जोडो न्याय यात्रेचा आवाज दडपवु पाहणाऱ्या भाजपच्या विरोधात लोणार तालुका काँग्रेस कमिटी व शहर काँग्रेस कमिटीच्या वतीने तिव्र आंदोलन करून भाजप प्रणित गुंडगिरीचा निषेध करून त्यांच्यावर कठोर गुन्हे दाखल करून त्यांना अटक करण्यात मागणी करण्यात आली. अन्यथा काँग्रेस पक्षाकडून तीव्र आंदोलन करण्यात येईल असे निवेदन तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते साहेबराव पाटोळे,उपनगराध्यक्ष बादशाह खान,गटनेते भूषण मापारी,अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष तौफिक कुरेशी,ज्येष्ठ नेते प्रदीप संचेती, माजी सभापती ज्ञानेश्वर चिभडे, नगरसेवक संतोष मापारी,माजी नगरसेवक पंढरी चाटे, शेख अस्लम शेख कासम, शहर काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अप्पा शिंदे, ओबीसी सेल तालुका अध्यक्ष संजय राठोड, प्रल्हाद नाईक पुजारी, माणिक राठोड उपसरपंच, संजय प्रभू, दत्ता राठोड, सखाराम राठोड, प्रेम सिंग, कन्नू राठोड सह काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते पदे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





दैनिक आधुनिक केसरीतील अयोध्या सोहळ्याच्या वृत्ताचे वाचताना दै. खान्देश मैदानचे मुख्य संपादक मनोज गर्दे, दै. श्रमराज्यचे मुख्य संपादक अतुल पाटील तथा पत्रकार संघाचे अध्यक्ष व उपाध्यक्ष तसेच नामांकित उद्योजक चेतन मंडोरे. छायाचित्र : आकाश सोनवणे

# शिवसेनेच्या रामदास कांबळेंनी दाखविला 'सत्यशोधक' सिनेमा



आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** 'सत्यशोधक' हा चित्रपट खंडाळा तालुक्यातील महिलांसाठी मोफत दाखविण्यात येईल असे आवाहन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षाचे सातारा जिल्हा समन्वयक व खंडाळा तालुक्याचे युवा नेतृत्व रामदास कांबळे यांनी केले होते.हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीचे औचित्य साधून रामदास कांबळे यांनी या महत्वपूर्ण उपक्रमाचे आयोजन केले होते. त्यानुसार जवळपास ३०० महिलांनी या उपक्रमात सहभागी होत हा सत्यशोधक सिनेमा पाहिला असल्याची माहिती खुद्द रामदास कांबळे यांनी दिली.रामदास कांबळे यांच्या आवाहना नंतर महिला वर्गांची पाऊले सत्यशोधकच्या दिशेने आली.महिला वर्गांना सत्यशोधक हा चित्रपट दाखविता आल्याने याबद्दल रामदास कांबळे यांनी विशेष समाधान व्यक्त केले.महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे कार्य इथल्या महिला वर्गाला या सत्यशोधक सिनेमाच्या माध्यमातून समजावे. म्हणून जो उपक्रम रामदास कांबळे यांनी हाती घेत महिलांना हा सिनेमा मोफत दाखविण्याचा निर्णय घेतलायावेळी सिद्धिविनायक हॉस्पिटलचे सर्वेसर्वा व सुवर्णगाथा प्रतिष्ठानचे अध्यक्ष नितीन सावंत, संजीवनी हॉस्पिटलचे डॉ. बामणे, पीएसआय आंदलकर, सामाजिक कार्यकर्त्या उज्ज्वला तांबे, शेडगेवाडीच्या सरपंच शर्मिला ननावरे व इतर उपस्थित होते.सिनेमा सुरू होण्यापूर्वी राष्ट्रगीत घेण्यात आले. कांबळे म्हणाले की,खरंतर महापुरुषांचाच फक्त इतिहास लिहिला जातो.सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुलेंनी जे समाजासाठी कार्य केलेले आहे.ते कार्य दोन शब्दांत अजिबात मांडू शकत नाही.कारण त्यांनी शेण मातीचे गोळे स्वतः अंगावर झेललेले आहेत.त्यांनी जो त्याग केलेला आहे. त्यामुळे आजच्या महिला ह्या सक्षम झालेल्या पाहायला मिळत आहेत. चांगल्या पद्धतीने शिक्षण घेत आहेत.ज्या सावित्रीबाई फुलेंचा जन्म ज्या आपल्या नायगाव मध्ये झालेला आहे.नायगाव ला खूप मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे.नायगाव मध्ये जन्म झालेल्या या लेकीचा तिनं जो समाजासाठी,सर्व सामान्य महिलांसाठी जो त्याग केला. यातून या महिलांची जडणघडण झालेली आहे.त्यांचा आदर्श घ्यावा. त्यांनी केलेले कार्य आपणा सर्वांसमोर पोहचावे म्हणून शिवसेनेचे पक्षप्रमुख हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे साहेब यांच्या जयंतीनिमित्त गेली दोन दिवस आपण सत्यशोधक या सिनेमाचे आयोजन केलेले आहे. आज महिलांनी सावित्रीबाई फुलेंचे कार्य आत्मसात करायला सुरुवात केलेली आहे.असे सुद्धा रामदास कांबळे यांनी म्हटले. यावेळी नितीन सावंत म्हणाले की,सत्यशोधक सिनेमा पाहण्यासाठी आपल्या भागातील महिला मोठ्या संख्येने उपस्थित आहेत. खरं म्हटलं तर हा सिनेमा संघर्षाचा जीवनपट आहे.पुरुषांचा संघर्ष आपण अनेक ठिकाणी पाहत असतो.

हा संघर्ष निश्चितच महिलांच्या साठी एक प्रेरणा ठरेल.असे या ठिकाणी मला वाटतं. कारण त्या काळामध्ये ज्या मनुवादी समाज व्यवस्था होती. त्या समाज व्यवस्थेच्या विरुद्ध कुठल्याही प्रकारे न डगमगता सर्व विरोधकांना पुरून उरल्या.त्यांच्या विचारांना ठाम राहून महिलांच्यासाठी जो लढा उभा केला त्या लढ्याचं निश्चितपणे प्रेरणा या ठिकाणी महिला घेतील.फुले दांपत्यानी जो संघर्ष केला तो निश्चितपणे आजच्या समाजाला दिशादर्शक हा आहे.हा देश घडविण्यात जेवढा वाटा पुरुषांचा आहे.तेवढाच वाटा हा महिलांचा आहे.म्हणून सत्यशोधक सिनेमास महिलावर्गाला आपण घेऊन आलात.त्याबद्दल आदरणीय शिवसेनेच्या उध्दव साहेबांच्या शिवसेनेचे काम करणारे आमचे धडाडीचे सहकारी रामदासजी कांबळे यांचं ही कौतुकच करेन असे सुद्धा नितीन सावंत यांनी म्हटले.



# पैठणमध्ये रामलल्लासाठी दुर्गादेवी महिला मंडळाची छप्पन भोग आरास

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** भारतात सर्वत्र रामलल्लाच्या प्राणप्रतिष्ठा सोहळ्याने आनंदाचे वातावरण आसल्याने पैठण शहरातील दुर्गावाडी येथील महीला भगिनींनी देवी मंदिरात रामलल्लाच्या आगमणा निमित्ताने मंदिरावर विद्युत रोषणाई करून संध्याकाळी महीला एकत्र येवून रामरक्षा स्तोत्र,हनुमान चालीसाचे सामुदायिक पठण करुन आरती नंतर घरासमोर दिवे पेटवुन रामलल्लाला 56 भोग मिष्टान्नचा प्रसाद अरास केली होती.

यात रामलल्ला,हनुमंताला आवडणारे विविध पदार्थ होते. यानिमित्ताने दुर्गावाडी येथील सौ.पुजा पारीख,रेणुका बरकसे,सुचित्रा जोशी,आश्विनी मडके,सुनिता बरकसे,जयश्री मडके,अनुराधा राठी,ऐश्वर्या बरकसे,माधुरी दहीवाळ,श्रृती जावळे,नंदा बेल्हेकर,पायल वर्मा,अपुर्णा पुर्णपात्रे सह दुर्गादेवी महीला मंडळाच्या महीलाची उपस्थिती होती.



# आ. राजेश पवार यांच्या नेतृत्वाखाली धर्माबाद तालुक्यातील अनेक दिग्गज भाजपात

आधुनिक केसरी न्यूज

> लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर परिषद स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूकीच्या अगोदर नेते मंडळीना धर्माबाद तालुक्यात पक्ष प्रवेश हालचालीना वेग आला आहे . नुकतेच भाजपा व शिवसेना शिंदे गटाच्या पद अधिकाऱ्यांसह अनेक कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटामध्ये पक्ष प्रवेश केले होते . त्याच पाठोपाठ आज भाजपाने खेळी खेळत धर्माबाद शहरा सह ग्रामीण भागामध्ये मातंग समाजाचा मोठा चहिरा राजकारणातला मानले जाणारे बी . एम . गोणारकर यांचा फायदा नकी येणाऱ्या निवडणुकीत होणार असे राजकीय वर्तुळात चर्चा जोरात चालू आहे .असे असले तरी भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गट,या दोन्ही पक्षांना नेमकं किती नफा आणि किती तोटा होणार हे निवडणूकी नंतर चित्र स्पस्ट दिसणार .

**बाबुराव गोणारकर**

**धर्माबाद :** आ. राजेश पवार यांच्या विकास निधी तुन नायगाव विधानसभा मतदारसंघात होत असलेल्या विकास कामाला भारावून स्वर्गीय बापूसाहेब देशमुख गोठेकरांचे कट्टर समर्थक त्याचप्रमाणे नंतर काँग्रेसचे समर्थक झालेले बाजार समितीचे माजी संचालक दत्ताहरी पाटील आवरे हे राष्ट्रवादी पक्षाचे माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी बी. एम. गोणारकर यांच्या सह अनेक कार्यकर्ते आमदार यांच्या नांदेड येथील निवासस्थानी उपस्थित प्रवेश केला आहे. प्रस्थापितांना धक्का बसला आहे. आमदार राजेश पवार यांनी आपल्या विकास कामांवर लक्ष दिले असून नायगाव विधानसभा मतदारसंघासह धर्माबाद तालुक्यात अनेक विकासकामे मार्गी लागले तर अनेक कामांचे भूमिपूजन करण्यात आले.भाजपा तालुका अध्यक्ष विजय पाटील डांगे व कृषी उत्पन्न बाजार समिती माजी संचालक तथा भाजपा शहराध्यक्ष रमेश गौड यांनी वेळोवेळी शहरात व ग्रामीण भागातील विकास कामे आणून देतात.ज्यामुळे आमदार राजेश पवार यांनी स्वतः गावोगावी भेटी देऊन नागरिकांशी समशा जाणून विकास केल्यामुळे माजी बाजार समितीचे संचालक दत्ताहरी पाटील आवरे, माजी नगराध्यक्ष प्रतिनिधी बी. एम. गोणारकर, चिकना उपसरपंच देविदास दुड्डे, दशरथ आवरे, रामदास रेपनवाड, प्रकाश आवरे, मिया पटेल, मिरामोईद्दीन, रियाजोद्दीन, निजामुद्दीन पिंजारी, गंगाराम कवडेकर, मारुती कदम, हनुमंनलू भैरवाड, ईश्वर आवरे, शेख बाबू, तसेच शहरी भागातून नगरपालिकेचे माजी सभापती दिनेश राहेरकर, साईनाथ बोईनवाड,लक्ष्मीबाई बेलूरवाड, सारिका चिंतावार, लक्ष्मीबाई बंटूवाड, ज्योती पवन संगावार, छाया चिकटवाड, अनुराधा कोमटवार, कौशल्या दारमोड, वनिता भंडारी, सुमुलता पटकोटवार, यांन आमदार राजेश पवार यांच्या उपस्थितीत प्रवेश केला.



अयोध्येत प्रभू श्रीरामचंद्रांची प्राणप्रतिष्ठापणानिमित्त चंद्रपूर जिल्ह्यातील नागरिकांनी उस्फुर्त सहभाग घेतला होता. सकाळपासूनच नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती. विविध ठिकाणी भजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. फटाक्याची आतिषबाजी करुन नागरिकांनी दिवाळी साजरी केली आहे. त्यातच मास्टर अबीर साखरकरने प्रभू श्रीराम वेषात येऊन डान्स करत सर्वांची मने जिकली त्याचा हा विडिओ मोठया प्रमाणात प्रसारमाध्यमवर वायरल होतो आहे. छायाचित्र : धनंजय साखरकर

# अमळनेर येथे होणार मराठी विद्रोही साहित्य संमेलन

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** विद्रोही साहित्य संमेलनात उत्सव नव्हेतर विचारांची उधळण होईल. घरुन भाकरी खावून विचार पुढे येणारे आपण असून शासनाचे कोणतेही अनुदान न घेता अथवा धनाढ्यांकडून देणग्या गोळा न करता एक मुठ धान्य आणि एक रुपया सामान्यांकडून घेवून त्यांचा सहभाग महत्वाचा मानत हे संमेलन अमळनेर येथे दि.३ व ४ फेब्रुवारी रोजी आयोजीत करण्यात आले आहे. संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ ग्रामिण साहित्यीक प्रा.डॉ.वासुदेव मुलाटे हे आहेत. या साहित्य संमेलनाच्यानिमित्ताने उद्या दुपारी ४ वाजता छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा ते महात्मा गांधी पुतळा या दरम्यानच्या आग्रारोडवरुन संदेश यात्रा काढण्यात येईल अशी माहिती कॉ.किशोर धमाणे, विद्रोही मराठी साहित्य संमलेनाचे प्रवर्तक अविनाश पाटील, खान्देश साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा.सदाशिव सूर्यवंशी, अहिराणी साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रा.भगवान पाटील आणि व्रिदोही सांस्कृतीक चळवळ राज्य कार्यकारणीचे सहसमन्वयक एल.जे. गावीत यांनी धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात पत्रकार परिषद घेवून दिली. या पत्रकार परिषदेत विद्रोही सांस्कृतीक चळवळीचे राज्य संघटक कॉ.किशोर धमाले म्हणाले की, खान्देशातील अमळनेर येथे ३ व ४ फेब्रुवारी रोजी १८ वे विद्रोही मराठी साहित्य संमेलन होत असून या साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन सुप्रसिध्द हिंदी व्यंग कवी संपत सरल यांच्याहस्ते होईल. तर प्रख्यात उर्दू साहित्यीक रहेमान अब्बास हे प्रमुख पाहुणे म्हणून असतील. महाराष्ट्रात विद्रोही सांस्कृतीक चळवळीच्या माध्यमातून आतापर्यंत मुंबई,कोल्हापूर, सोलापूर, अमरावती,नंदुरबार, सिंधूदुर्ग, धुळे या ठिकाणी व्रिदोही साहित्य संमेलने आयोजीत केली गेली आहे. बाबुराव बागुल, वाहरु सोनवणे, डॉ.यशवंत मनोहर, डॉ.अजीज नदाप, आत्माराम राठोड, तारा रेड्डी, तुलसी परब,जयंत पवार, डॉ.आ.ह.साळूंखे, उर्मीला पवार,प्रा.डॉ.आनंद पाटील, गणेश विसपुते, चंद्रकांत वानखेडे या सर्जनशिल प्रगतीशिल साहित्यीक नाटककार, कवी समीक्षकांनी संमेलनाचे अध्यक्षपदे भुषवीत विद्रोही साहित्य संस्कृतीचा आवाज बुलंद केला आहे. अंतरराष्ट्रीय ख्यातीचे मार्क्सवादी विचारवंत डॉ.एजाज,प्रसिध्द शायर निदा फाजली, डॉ.उमा चक्रवती, सुशिला टाकभौवरे, जयंत परमार, गोहार रझा,रसिका आगाशे, आदींनी विद्रोही साहित्य संमेलनाचे उद्‌घाटन करुन विद्रोही जागरात आपला सहभाग नोंदविला आहे.अठराव्या साहित्य संमेलनाचे डॉ.वासुदेव मुलाटे यांची विश्‍ववृक्षाच्या मुळ्या ही कादंबरी, व्यथा फुल, आधार रंग, झाड आणि संमंध हे कथासंग्रह, झोकाळलेल्या वाटा हे आत्मकथन यासह विपुल लेखन प्रसिध्द केले आहे. अमळनेर येथील आर.के. नगरच्या समोरील भव्य प्रांगणात हे संमेलन होणार आहे. संमेलनात परिसंवाद,कवी संमेलने,गटचर्चा ,कथाकथन युवामंच, गझल संमेलने, नाटक, एकपात्री,बालमंच, विचार यात्रा यांची रेलचेल असणार आहे. विद्रोही मराठी साहित्य संमेलनाच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्ह्यातील विद्रोही साहित्यीक समविचारी नेते, पदाधिकारी,कार्यकर्ते योगदान देत आहेत. यापत्रकार परिषदेला वरिल मान्यवरांसह मराठी नाट्य परिषदेचे राज्य पदाधिकारी चंद्रशेखर पाटील, धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे नवनिर्वाचीत अध्यक्ष मनोज गर्दे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# पळसरखेड शिवारात दरोडा

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** तालुक्यातील पळसखेड शिवारात 22 जानेवारीच्या रात्री एका घरावर अज्ञात चोरट्यांनी दरोडा टाकून 1 लाख 30 हजाराचा मुद्देमाल चोरीची गजब घटना घडली. अज्ञात चोरट्यांनी महिलांसह त्यांच्या पतीला मारहाण केली, त्यांनतर अंगावरील दागिने हिसकावून पसार झाल्याची खळबळजनक घटना आज 23 जानेवारी सकाळी उघडकीस आली. दरम्यान कांताबाई कांगणे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आज 23 जानेवारी रोजी सकाळी अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. कांताबाई कांगणे त्यांच्या पती व सवतीसह पळसखेड शिवारात राहतात. काल रात्री आपली सवत कायराबाई यांच्यासह त्या घरात झोपलेल्या होत्या. त्यांचे पती शंकर कांगणे घराबाहेरील खाटेवर झोपलेले होते, झोपेत असतानाच त्यांच्या पतीचा ओरडण्याचा आवाज ऐकुन त्या जागी झाल्या. समोर पाहताच तिघे त्यांच्या पतीला लोखंडी रॉडने मारहाण करत होते, त्यातील एकाने त्यांच्या पतीचे हातपाय बांधून ठेवले, त्यांनतर दोघे घराच्या आत शिरले व दोघांनी महिलांना मारहाण सुरू केली. कांताबाईला गालात चापट्या मारल्या, आणि दोघींच्याही गळ्यातील, कानातील दागिने, हिसकावले घरातून बाहेर पडताना सुध्दा दोघांनी कायराबाईला जबर मार दिला. कायराबाई तसेच शंकर कांगणे यांना गंभीर मारहाण झाल्यामुळे त्यांची प्रकृती गंभीर आहे. त्यांना उपचारासाठी जालना येथे दाखल करण्यात आले होते, मात्र प्रकृती चिंताजनक असल्यामुळे दोघांना छ. संभाजीनगर येथे हलवण्यात येत असल्याची माहिती मिळाली. चोरट्यांनी धारदार चाकूने कायराबाई यांच्या हातावर वार केला होता. आज 23 जानेवारीच्या सकाळीच घटनास्थळी पोलिसांनी धाव घेतली. अज्ञात चोरट्याविरुद्ध लोणार पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





# निरेत सुभाषचंद्र बोस, बाळासाहेब ठाकरेंची जयंती उत्साहात साजरी

## अभिवादन प्रसंगी शिवसेनेच्या दोन्ही गटाची हजेरी

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** तुम मुझे खून दो मैं तुम्हे आझादी दूंगा असा क्रांतीचा नारा देणारे नेताजी सुभाषचंद्र बोस आणि तोंड वाजवून न्याय मिळत नसेल तोंडात वाजवून न्याय मिळवा पण न्याय मिळालाच पाहिजे, असे ठणकावून सांगणारे हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंती निमित्त निरा-शिवतक्रार ता.पुरंदर येथील ग्रामपंचायत कार्यालयात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी नेताजी सुभाषचंद्र बोस आणि बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. अभिवादन कार्यक्रमासाठी ग्रामपंचायतीच्या वतीने ग्रामपंचायतीचे उपसरपंच राजेश काकडे,ग्रामपंचायत सदस्य प्रमोद काकडे उपस्थित होते.तसेच शिवसेनेच्या दोन्ही गटाने हजेरी लावली होती.

शिवआरोग्य सेनेचे आदिराज कोठडीया, शिवसेना शिंदे गटाचे तालुका उपाध्यक्ष दयानंद चव्हाण,विद्यार्थी सेना प्रमुख निखिल बनसोडे,संग्राम गोणे,अजय राऊत, राजेंद्र पटणे व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे निरा शहर प्रमुख सुदाम बंडगर,युवा सेना शहर प्रमुख सागर बागडे,युवा सेना सचिव सुशांत ढोक तसेच ग्रामपंचायतचे कर्मचारी उपस्थित होते.

# राष्ट्रवादी महाराष्ट्र प्रदेश डॉक्टर सेलच्या कन्नड तालुका अध्यक्षपदी डॉ. काचोळे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** मल्टीस्पेशालिटी तथा समर्थ हॉंस्पीटलचे डॉ.महेश पोपटराव काचोळे यांची राष्ट्रवादी (अजित दादा गट) कॉंग्रेसचे महाराष्ट्र सेलचे प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब पवार, जिल्हाध्यक्ष विश्वासराव सांळुखे पाटील यांनी नियुक्ती पत्र देऊन नुकतीच निवड केली.

छत्रपती संभाजीनगर येथे जिल्हाध्यक्ष विश्वासराव सांळुखे पाटील यांच्या कार्यालयात प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब पवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत रविवारी डॉ. महेश काचोळे यांची निवड करण्यात आली. त्यांच्या या निवडीबद्दल माजी गटनेते संतोष कोल्हे, राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्षा स्वाती कोल्हे, तालुका अध्यक्ष प्रकाश गाढेकर, कन्नड डॉंक्टर असोसिएशनचे तालुका अध्यक्ष डॉ. प्रविण पवार, डॉ. सिताराम जाधव, डॉ. सदाशिव पाटील, डॉ.आनंद मोतिंगे, डॉ. मनिषा मोतिंगे, डॉ .सदाशिव पाटील डॉ. विनोद पाटे, डॉ. मिलिंद पाटील, डॉ.प्रदिप कांबळे, डॉ. सिंकदर कुरेशी, डॉ.प्रमिला कांबळे, डॉ. राहुल पाखरे, डॉ. मंगेश बरबंडे, डॉ.दीपक जवळकर, डॉ. प्रमोद पुराणिक, डॉ. अनिल लोहाडे, डॉ. मिलिंद पाटील, डॉ. विलास पाटील, डॉ. शरयू अकोलकर, डॉ.कृष्णा सपकाळ, डॉ. प्रकाश नागणे, डॉ. निलेश जयस्वाल, डॉ. प्रमिला अग्रवाल,डॉ. प्रमिला जैतापूरकर, डॉ. गोवर्धन अग्रवाल डॉ. रविराज जाधव आदिनी अभिनंदन केले.



# विद्यापीठात युनिकोड व मराठी लेखन कार्यशाळा

## विनोद जैतमहाल व डॉ. नागेश अंकुश करणार मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा मराठी भाषा विभाग व विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्त 'युनिकोड व मराठी व्याकरण लेखन' कार्यशाळेचे आयोजन 25 जानेवारी रोजी सकाळी 11 वाजता विद्यापीठाच्या मराठी भाषा विभागात करण्यात आले आहे.






या कार्यशाळेच्या पहिल्या सत्रात 'संगणक व भ्रमणध्वनीवर युनिकोड मराठी लेखन' या विषयावर संगणक व भाषातज्ज्ञ विनोद जैतमहाल हे मार्गदर्शन करणार आहेत. व्यावसायिक कारणांसाठी ऑनलाइन जगात मराठीचा प्रभावी आणि निर्दोष वापर कसा करावा, संगणक व मोबाइलवर युनिकोड मराठी कसे वापरावे आणि मराठी शब्द लिहिण्यामागचे रंजक तंत्र कसे शिकून घ्यावे याविषयी विनोद जैतमहाल प्रात्यक्षिक स्वरूपात कार्यशाळा घेणार आहेत. तर दुसऱ्या सत्रात 'सुगम मराठी व्याकरण - लेखन' या विषयावर मराठी व्याकरण तज्ज्ञ डॉ. नागेश अंकुश हे मार्गदर्शन करतील. डॉ. नागेश हे गेल्या अनेक वर्षांपासून मराठी व्याकरणासाठी समर्पित शिक्षक असून त्यांची या विषयावर अनेक पुस्तके प्रकाशित आहेत. यापूर्वीही त्यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी असंख्य कार्यशाळा घेतल्या आहेत.

ही कार्यशाळा मराठीच्या विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी असून या मोफत कार्यशाळेचा लाभ विद्यार्थी व नागरिकांनी मोठ्या संख्येने घ्यावा, असे आवाहन मराठी विभाग प्रमुख डॉ. दासू वैद्य, समन्वयक डॉ. कैलास अंभुरे व उपायुक्त जगदीश मिनियार यांनी केले आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम परवाना क्र.218, औरंगाबाद

उपलब्ध सुविधा

- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे



पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद

# प्राणप्रतिष्ठेनिमित्त भाजपा प्रदेश कार्यालयात आनंदोत्सव

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** अयोध्या येथील भव्य मंदिरात प्रभू श्री रामचंद्रांच्या मूर्तीची प्रतिष्ठापना झाल्यानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयात सोमवारी प्रचंड जल्लोषात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. प्रदेश कार्यालयात अयोध्या येथील कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण एल ई डी स्क्रीनद्वारे दाखविण्याची व्यवस्था करण्यात आली होती. अयोध्येतील मंदिरात विधिवत प्राण प्रतिष्ठा झाल्यानंतर फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली.मिठाई वाटपही करण्यात आले. यावेळी रामभक्तांनी केलेल्या प्रभू रामचंद्रांच्या जयघोषाने आसमंत दुमदुमून गेला होता. या आनंदोत्सव कार्यक्रमात भाजपा प्रदेश समन्वयक विश्वास पाठक, ज्येष्ठ नेते कृपाशंकर सिंह,राज पुरोहित,ज्येष्ठ कार्यकर्त्या शैला पतंगे - सामंत,प्रदेश प्रवक्ते ओमप्रकाश चौहान,प्रदेश कार्यालय सचिव मुकुंद कुलकर्णी यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त सुरेश शुक्ल आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या भजनाचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला होता.प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त मुंबईत आणि राज्यातही अनेक ठिकाणी भाजपा तर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



# चांदा ब्रिगेडच्या वतीने अकरा प्रकारच्या भातांचे महाप्रसाद वितरण

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** अयोध्या येथे पार पडलेल्या रामचंद्राच्या प्राणप्रतिष्ठापना निमित्त यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने महानगर पालिका पटांगणात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी 11 प्रकारच्या भातांचा महाप्रसाद वितरित केला गेला. तर संस्कार टिव्ही फेम भजन सम्राट दिनेशजी शर्मा याच्या भजन कार्यक्रमाचे राममय वातावरण निर्माण झाले.

यावेळी आमदार किशोर जोरगेवार, माजी नगर सेवक बलराम डोडाणी, दामोदर सारडा, डॉ. सुशिल मुंधडा, शिव सारडा, सुरेश राठी, राजेश काकानी, राजु शास्त्रकार, संदिप भाटिया, यंग चांदा ब्रिगेडचे युवा नेते अमोल शेंडे, महिला शहर प्रमूख वंदना हातगावकर, सविता दंडारे, सायली येरणे, नकुल वासमवार, विनोद अनंतवार, बबलू मेश्राम, आशा देशमूख, करणसिंग बैस, किशोर बोलमवार, हेरमन जोसेफ, कार्तीक बोरेवार, दुर्गा वैरागडे, वंदना हजारे, यांच्यासह यंग चांदा ब्रिगेडच्या पदाधिका-यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

आज सोमवारी अयोध्या येथे पार पडलेल्या प्राणप्रतिष्ठापना सोहळ्या निमित्त संपूर्ण देशात विविध धार्मीक सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. चंद्रपूरातही आमदार किशोर जोरगेवार संस्थापक अध्यक्ष असलेल्या यंग चांदा ब्रिगेडच्या वतीने महानगर पालिकेच्या पटांगणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. सकाळी 8.00 वाजता पासून या कार्यक्रमांना सुरवात झाली. यावेळी भव्य एलईडी स्क्रीनवर अयोध्या मंदिर प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दाखविण्यात आले. सकाळी 8.30 वाजता लखमापूर भजन मंडळाच्या वतीने सुंदरकांड करण्यात आले आहे. दुपारी 1 वाजेपासून संस्कार टिव्ही फेम भजन सम्राट दिनेशजी शर्मा यांच्या भजन कार्यक्रमाला सुरवात झाली. यावेळी दिनेशजी शर्मा यांनी आपल्या भक्तीमय भजनाने धार्मीक वातावरण निर्माण केले. त्यांच्या भजन कार्यक्रम पाहण्यासाठी रामभक्त चंद्रपूरकरांनीही मोठी गर्दी केली होती. तर चंद्रपूर जिल्हा भात उत्पादक जिल्हा असल्याने 11 प्रकारच्या भातांचे महाप्रसादाचेही येथे वितरण करण्यात आले. यात गोड भात,



आमदार किशोर जोरगेवार यांनी केली रामलल्लाची आरती
अयोध्या येथे रामलल्लाची आरती सुरु होताच आमदार किशोर जोरगेवार यांनीही कार्यक्रमाच्या आयोजित स्थळी रामलल्लाची आरती केली . या आरतीत शेकडो चंद्रपूरकर सहभागी झाले होते . यावेळी ११ प्रकारच्या भातांचा श्री प्रभू रामचंद्र यांना प्रसाद चढविण्यात आला . आजचा दिवस देशासाठी गौरवाचा आहे . इतिहासात या दिवसाची नोंद केली जाणार असल्याचे यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले .



मसाला भात, खट्टा भात, दही भात, गद्दा भात, गुळ भात, दाल खिचड़ी भात, मटर भात, पालक भात, टमाटर भात, मसूर भात आदी प्रकारच्या भातांचा समावेश होता. यावेळी हजारो नागरिकांनी या महाप्रसादाचा लाभ घेतला.



पंचायती श्री बालाजी मंदिर ट्रस्ट चेलिपुरा छत्रपती संभाजीनगर येथे अयोध्येतील प्रभु श्रीराम प्राणप्रतिष्ठेनिमित्त पुजा अर्चना करून जल्लोष साजरा करण्यात आला. बालाजी मंदिर ट्रस्टचे शितल नाईक, दत्तात्रय भंडारे, कामेकर काका, कैलास मनिठे, प्रभा वरे, किशोर दडपे, गजानन श्रीरामवार, विजय जक्कल, जय भोले क्रिडा मंडळाचे सदस्य व परिसरातील नागरिकांची लक्षणीय उपस्थिती होती.

# पाककृती स्पर्धा व हळदी कुंकू कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**चिंचोली (लिं.) :** येथील गृहविज्ञान विभाग तसेच राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे पाककृती स्पर्धा व हळदी कुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. बनकर यांनी गावातील महिला व विद्यार्थ्यांसाठी एकत्रित स्पर्धा आयोजित करण्यामागचा उद्देश व संक्रांती काळातील आहाराचे महत्त्व समजावून सांगितले. कार्यक्रमासाठी परीक्षक व व्याख्याते म्हणून सौ.श्रद्धा शिंदे ह्यांची प्रमुख उपस्थिती होती. मार्गदर्शन करताना सौ.शिंदे यांनी विद्यार्थ्यांना विविध उद्योग क्षेत्रात येण्यासाठी निरनिराळे उदाहरणाद्वारे प्रोत्साहित केले. तसेच नैतिक मूल्यांची जाणीव देखील करून दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्ष डॉ अनिता खंडागळे यांनी देखील विद्यार्थ्यां तसेच महिलांसाठी कला कौशल्य विकास आवश्यक असल्याचे सांगितले .यावेळी कार्यक्रमासाठी वाकी येथील सरपंच सौ.कविता जंजाळ, गणेशपुर येथील सरपंच कंचनाबाई चरावंडे ,सौ. प्रतिभा सपकाळ , शुभांगी कुलकर्णी , मनिषा काथार, अलका बिऱ्हारे ,मनिषा गिरी ,कविता गिरी, सिमा गायकवाड, पुजा बिऱ्हारे,कार्तिकी सपकाळ, दिक्षा बिऱ्हारे, ज्ञानू पवार, किरण भुजंग, दिपाली वैष्णव, कल्पना दिवटे, सायली बिलंगे,सोमिनाथ पवार ,जय पवार, नम्रता चरावंडे, सोनल चरावंडे, निकिता मेहर ,उमा महेर ,कविता पवार, प्रतिभा पवार, उज्वला कुलकर्णी ,रितू चदंवाडे,अमृता गोमलाडू, वर्षा राजरवाल, शुभदा कुलकर्णी, प्रियंका राजरवाल ,काजल कवाळ, भारती ताटू, माधूरी भुजंग, गौरव बावसकर, पुनम सोळुंके, श्रेया सोळुंके ईत्यादी महिला व विद्यार्थ्यांनी पालेभाज्या , तृणधान्य, भरडधान्य वापरून विविध नाविन्यपूर्ण पदार्थ तयार करून या पाककृती स्पर्धेत सहभाग घेतला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु.काजल कवाळ तसेच आभार डॉ. प्रतिभा आघार्डे यांनी मानले .या कार्यक्रमास महाविद्यालयातील डॉ. उमाकांत गायकवाड, डॉ. विक्रमसिंह पवार, डॉ. संजय मगर, डॉ. यशवंत गाढे, डॉ. सुनिल काळे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# श्रीराम शोभायात्रेत साकारला सजीव देखावा

आधुनिक केसरी न्यूज

**भुसावळ :** येथील जामनेर रोडलगत असलेल्या रामानंद नगर, दूर्गा कॉलनी परिसरातील कपिलेश्वर महादेव मंदिरातर्फे परिसरात शोभायात्रा काढण्यात आली. या शोभायात्रेत श्रीराम, लक्ष्मण, सीता व हनुमान यांचे सजीव देखावे साकारण्यात आले. सायंकाळी ही मिरवणूक परिसरातून काढण्यात आली. सकाळी अकरा वाजेपासून मंदिर आवारात मंडप टाकून मोठ्या स्क्रीनद्वारे अयोध्या येथील प्रभू श्रीराम मंदिरातील मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा दाखवण्यात आला. शेकडो भाविकांनी मंडपात बसून प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचा लाभ घेतला. त्यानंतर महाआरती झाल्यावर प्रसादाचे वाटप करण्यात आले. दुपारी शोभायात्रेने मिरवणुकीची सुरूवात झाली. प्रभू श्रीरामाची भूमिका कुमारी भक्ती हिने, लक्ष्मणाची भूमिका सिद्धी हिने, सीतेची भूमिका लावण्या हिने तर हनुमानाची भूमिका दिशांत या मुलाने साकारली. परिसरातील विविध नगरांमधून शोभायात्रा मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक मार्गावर ठिकठिकाणी सडा घालून रांगोळी काढण्यात आली होती. तसेच सजीव देखाव्यांची घराघरासमोर पूजाआरती करण्यात येत होती. मिरवणुकीदरम्यान तुषार सराफ यांच्या घरासमोर पाच जोडप्यांच्या हस्ते प्रभू श्रीरामाची महाआरती करण्यात आली. शोभायात्रा मंदिराच्या आवारात पोहोचल्यानंतर तेथे सामूहिकरित्या रामरक्षा स्तोत्र म्हणण्यात आले. त्याचे नेतृत्व चंद्रकांत महाराज व लक्ष्मण महाराज यांनी केले. डॉ. जगदीश पाटील नेट उत्तीर्ण झाल्याबद्दल त्यांचा मंदिरातर्फे सत्कार करण्यात आला. शोभायात्रेत हजारो भाविकांनी सहभाग घेतला होता. शोभायात्रा यशस्वीतेसाठी कपिलेश्वर महादेव मंदिर ट्रस्ट पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.



# जिंतूर येथे रस्ता सुरक्षाविषयक शिबिर

आधुनिक केसरी न्यूज

बि.डी. रामपूरकर
**जिंतूर :** दि.22 रोजी जिंतूर येथील छत्रपती शिवाजीमहाराज चौकात सुरक्षा विषयी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी वाहन चालक ,व्यापारी व नागरिक यांना रस्ता नियमांची माहिती देऊन जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.
यावेळी जिंतूर शहरात सोबतच ग्रामीण भागातील नागरिकही उपस्थित होते.
या कार्यक्रमास जिंतूर महामार्ग ची पोलीस उपनिरीक्षक गणेश कदम यांनी उपस्थित त्यांना रस्ता सुरक्षा अभियानांची मार्गदर्शन केले. त्यावेळी शहरातील व ग्रामीण भागातील नागरिक,व्यापारी, वाहन चालक व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.
या कामी जमादार अमोल शेंडगे ,पोलीस नाईक श्रीकांत कदम, पोलीस कॉं. व्यंकट नरवडे, पोलीस कॉं. महेश केदारी आदींनी सहकार्य केले. या कार्यक्रमात विविध वाहतुकीच्या नियमां बद्दल उपस्थिततांना अवगत केले नागरिकात रस्ता सुरक्षा विषयक जागृती निर्माण केली आणि रस्ता सुरक्षिततेची माहीती दिली.



# नेमिनाथ जैन यांना समता उत्कृष्ट ग्रंथालय सेवक पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज



**जिंतूर :** तालुक्यातील बोरी येथील कै.जयकुमारजी जैन सार्वजनिक वाचनालयाचे ग्रंथपाल नेमिनाथ जैन यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय जिंतूर चा समता उत्कृष्ट ग्रंथालय सेवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
जिंतूर येथे रविवारी लक्ष्मी मंगल कार्यालयात जिल्हा ग्रंथालय संघाच्या वार्षिक अधिवेशनात माजी आमदार विजयराव भांबळे यांच्या हस्ते श्री जैन यांचा सन्मानपत्र, सन्मानचिन्ह, पुष्पगुच्छ व ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला.
यावेळी उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबईचे विशेष कार्यकारी अधिकारी प्रशांत पाटील, सिनेट सदस्य डॉ. रामेश्वर पवार, छत्रपती संभाजी नगर विभागाचे सहा ग्रंथालय संचालक सुनील हुसे, अनिल बाविस्कर, भास्कर पिंपळकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. नेमिनाथ जैन यांना याआधी ग्रंथालय क्षेत्रातील योगदानाबद्दल नांदेड ,बोरी,महाड ,बेळगाव ,पुणे, म्हाडा, सातारा, भोकरदन व जळगाव येथील पुरस्कार मिळाले आहेत. जैन यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



# दिशा वाबळे या मुलीने रांगोळीतून साकारली अयोध्याच्या श्रीराम मंदिराची प्रतिकृती

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** अयोध्येमधील श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त इयत्ता ११ वीत शिकत असलेल्या फलटण येथील दिशा संजय वाबळे या मुलीने अयोध्याच्या श्रीराम मंदिराची प्रतिकृती रांगोळीच्या साहाय्याने साकारली.तसेच श्रीराम आणि सीतेचे छायाचित्र रेखाटले.या रांगोळी बद्दल दिशा वाबळे हिचे कौतुक केले जात आहे.

# जिंतूर शासकीय तंत्रनिकेतनात निवडणूक साक्षरता मंडळातर्फे मतदान जनजागृती

आधुनिक केसरी न्यूज

बि. डी. रामपूरकर
**जिंतूर :** शासकीय तंत्रनिकेतन जिंतूर येथे निवडणूक साक्षरता मंडळ तर्फे मतदान जनजागृती करण्यासाठी खालील स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.
रांगोळी स्पर्धा, पोस्टर प्रेझेंटेशन/चित्रकल, निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धा कार्यक्रमाचे उद्घाटक प्राचार्य डॉ.आर. टी. पाचकोर तसेच कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार मंचक देशमुख, गुलाबराव शिंदे,सचिन रायपत्रीवार, राम रेघाटे, शेख नूर तसेच सदरील स्पर्धेचे आयोजन श्रीमती आर के. देवशी प्रयोगशाळा सहाय्यक, एस.डी इप्पर, व्ही एम कराळे, यांचे कार्यक्रमास सहकार्य लाभले.
सदरील स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग उत्सुकतेपने नोंदवला. या मध्ये मतदान जनजागृती करत मतदान करण्याचा मला अधिकार आहे. विद्यार्थी रांगोळी काढल्या.



# जांभोळ गावामधे पाण्याची भीषण टंचाई

## आदिवासी समाजाला करावी लागते पाण्यासाठी भटकंती

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** महाराष्ट्राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे मंत्री तथा जामनेर मतदार संघाचे आमदार गिरीष महाजन यांच्या जामनेर मतदार संघा मधिल जांभोळ या गावामधे पीण्याच्या पाण्याची भिषण टंचाई सुरु असुन कर्मचारी अधिकारी यांच्या बेजबाबदार पणामुळे आदिवासी समाजाला पाण्यासाठी आज हीअनेक दिवसांपासुन भटकंती करावी लागत आहे वाकोद ,जांभोळ ग्रुप ग्रामपंचायत चे सरपंच आणि ग्रामसेवक यांच आदिवासी समाजाच्या विकासाकडे पुर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचे दिसुन येत आहे जर शासनाने या प्रकरणी त्वरीत दखल न घेतल्यास हे आदिवासी कुटुंब या त्रासाला कंटाळुन गाव सोडुन स्तलांतर होनार असल्याचे या कुटुंबांनी सांगितले.
या कुटुंबांना पिण्यासाठी पाणी मिळत नसल्यामुळे अनेक दिवसांपासुन आज ही भटकंती करावी लागत आहे या गोरगरीब आदिवासी कुटुंबांना पिण्यासाठी पाणी मिळत नसल्यामुळे बाहेर गावावरुन स्वता टँकर बोलावुन पाणी विकत घ्याव लागत आहे यांच्या सोबत भेदभाव केला जात असल्या ची प्रतिक्रीया या आदिवासी समाजाच्या महिलांनी दिली या कुटुंबांना शेतातील विहिरीवरती पाणी घेण्यासाठी सुद्धा मनाई आहे जर गेले तर त्यांना परत हकलुन देतात असे ही या कुटुंबांनी सांगीतले
सरपंच ग्रामसेवक यांना सतत सांगुन ही दखल घेत नाही यांचं या आदिवासी समाजाकडे सतत दुर्लक्ष असल्याचे ही सांगण्यात आले जामनेर तालुक्यातील कर्मचारी अधिकारी यांना कुनाचाही धाक उरलेला दिसुन येत नाही.
पुर्णपणे बेजबाबदार पणाने वागत आहे आदिवासी वस्तीकडे जानुन बुजुन दुर्लक्ष होत असल्याचे सांगण्यात आले जामनेर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी या गंभीर प्रकाराकडे कधी लक्ष देनार या कुटुंबांची पाण्याची समश्या कधी सोडवनार ? पाण्याच्या भीषण टंचाई मुळे पुर्ण आदिवासी समाज त्रस्त झालेला आहे, मंत्री महोदय या प्रकरणी या आदिवासी समाजाला न्याय मिळवुन देनार का याकडे सर्वांचे लक्ष लागलेले आहे.



शहरातील विश्वसनीय
बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# ताडोबात जटायुच्या अधिवासामुळे पर्यावरणाचे संरक्षण

## वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते जटायु संवर्धन प्रकल्पाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प वाघासाठी प्रसिद्ध असलेले संरक्षित क्षेत्र आहे. वाघांच्या या भुमीत आता जटायु पक्षाचे संवर्धन होणार आहे. जैवविविधता संवर्धनातील ही अतिशय महत्वाची बाब आहे. विशेष म्हणजे नामशेष होण्याच्या मार्गावर असणाऱ्या जटायु पक्षाच्या ताडोबातील अधिवासामुळे निसर्गाची श्रृंखला पुर्नस्थापित होण्यास मदत होईल, असा विश्वास राज्याचे वने, सांस्कृतिक कार्य, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केला. यावेळी त्यांच्या हस्ते कोळसा वन परिक्षेत्रातील वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालयाचे लोकार्पण करण्यात आले. महाराष्ट्र वन विभाग व बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटी, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने बोटेझरी जटायु संवर्धन राज्यस्तरीय प्रकल्पाचे उद्घाटन करतांना वनमंत्री मुनगंटीवार बोलत होते. यावेळी येथे बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे अध्यक्ष प्रविणसिंह परदेशी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महिप गुप्ता, वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक डॉ. जितेंद्र



रामगावकर, जिल्हा पोलिस अधिक्षक रविंद्रसिंह परदेशी, बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे संचालक किशोर रिठे, उपसंचालक नंदकिशोर काळे, सरपंच माधुरी वेलादे आदी उपस्थित होते. रामायणामध्ये जटायु पक्षाचे अनन्यसाधारण महत्व आहे, असे सांगून वनमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले, 22 जानेवारी रोजी अयोध्या येथे प्रभु रामाच्या प्राणप्रतिष्ठेचे औचित्य साधून ताडोबा येथे राज्यातील जटायु संवर्धनाचा महत्वाचा प्रकल्प साकारण्यात येत आहे. पहिल्या टप्प्यात पांढरी पाठ असणारे 10 जटायु पक्षी देण्यात आले असून यापुढेही टप्प्याटप्प्याने जटायु येणार आहेत. पुढे ते म्हणाले, प्राणवायु देणारे वन अतिशय महत्वाचे आहे. आज अर्थशास्त्रापेक्षा पर्यावरणशास्त्र आणि वनशास्त्राला महत्व आले आहे. चंद्रपूरच्या जनतेने वनांवर मनापासून प्रेम केले आहे. आयुष्याचा पहिला श्वास वनांसोबत आणि शेवटचा प्रवासही लाकडासोबतच होतो. त्यामुळे पर्यावरण राहिले तरच मनुष्यसृष्टी राहील आणि जटायु हा पर्यावरणाचा स्वच्छता दूत आहे, त्यामुळेच जटायु संवर्धनाचा संकल्प केला आहे. आज 10 जटायु आहे, आता त्याची संख्या 20 आणि पुढे 40 करण्यासाठी ज्यांच्या नावातच 'राम' आहे, अशा डॉ. रामगावकर यांच्यावर जटायू संवर्धनाची जास्त जबाबदारी आहे, असेही वनमंत्री सुधीर मुनगंटीवार म्हणाले. प्रास्ताविकात क्षेत्र संचालक डॉ. जितेंद्र रामगावकर म्हणाले, जटायुचे निसर्गामध्ये अनन्यसाधारण महत्व आहे. ताडोबा जटायुसाठी सुरक्षित वनक्षेत्र आहे. प्रथम टप्प्यात 10 जटायु संशोधकांच्या निरीक्षणाखाली ठेवल्यानंतर त्यांना निसर्गात सोडले जाईल. जटायु संवर्धन अतिशय मोलाचे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाला तन्मय बिडवई, निसर्ग पर्यटन मंडळाचे प्रकाश धारणे, डॉ. मंगेश गुलवाडे, अरुण तिखे, ब्रिजभुषण पाझारे, विभागीय वन अधिकारी सचिन शिंदे, वन परिक्षेत्र अधिकारी रुंदन कातकर यांच्यासह गावकरी उपस्थित होते.

**वनमंत्री श्री. मुनगंटीवार यांच्या प्रयत्नामुळेच जटायु संवर्धन प्रकल्प : डॉ. प्रवीण परदेशी**
चंद्रपूरकरीता आजचा दिवस अतिशय महत्वाचा असून अयोध्या येथे प्रभू रामाच्या प्राणप्रतिष्ठेपूर्वी ताडोबा व्याघ्र प्रकल्पामध्ये जटायुचे आगमन झाले आहे. जटायु पक्षामुळे निसर्गाची स्वच्छता होते. ताडोबा क्षेत्रातील गावे पुनर्वसित झाल्यामुळे येथे मनुष्यविरहीत जंगल आहे. त्यामुळे ताडोबा हे जटायुंचे चांगले अधिवास होईल. जटायु संवर्धन प्रकल्पासाठी राज्याचे वनमंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी विशेष पुढाकार घेतला. निसर्गाची श्रृंखला यामुळे पुर्नस्थापित होणार असल्यामुळे लुप्त झालेल्या जटायुचा पुनर्जन्म झाला असल्याचे बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीचे अध्यक्ष प्रविणसिंह परदेशी यांनी सांगितले.

**महाराष्ट्र भूषणच्या धर्तीवर आता वनभूषण पुरस्कार :** वनांसोबत आयुष्याचे एक नाते असते. वनांपासून वनांसाठी मनापासून काम करणा–यांना आता महाराष्ट्र भूषणच्या धर्तीवर वनभूषण पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल. ताडोबा उत्सवामध्ये या पुरस्काराची घोषणा करण्यात येणार असल्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले.

# अयोध्येतील श्रीराम मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्यानिमित्त भाविकांध्ये उत्साह

## सुलतानपूरकर भक्तीमय वातावरणात झाले धुंद

आधुनिक केसरी न्यूज

**सुलतानपूर :** अयोध्या येथील श्रीराम मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली आहे. त्यामुळे सुलतानपूर येथील भाविकामध्ये मोठे उत्साहचे वातावरण वाटतं होते. या सोहळ्या साठी भाविकांनी मागील तीन दिवसा पासून तयारीला लागले होते.
या मध्ये गावातील मंदिरे स्वच्छ करून सुशोभीकरण करणे, मंदिरावर विद्युत रोषणाई करणे शिवाय संपूर्ण गावामध्ये शेत शिवारामध्ये अक्षदा ( मूळ )वाटून सोहळ्याला येण्यासाठी ग्रामस्थांना निमंत्रनंची इत्यादी तयारी केली होती.दरम्यान सोहळ्या निमित्त गावातील श्रीराम मंदिरामध्ये काकडा, भजन व श्री राममूर्ती चा दुग्धभिषेकसह धार्मिक कार्यक्रम करण्यात आले. ट्रॅक्टरवर श्रीरामची प्रतिमा ठेऊन टाळ, मृदूंग व श्रीरामच्या नाम गजरात भव्य अशी दिंडी काढण्यात आली होती. दरम्यान यावेळी रस्त्याच्या दोन्ही बाजूने एक किलोमीटर पर्यंत (बस स्थानकावंरील मंदिर) रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या.दिंडीची सांगता झाल्या नंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.
या वेळी सुलतानपूर येथील युनिक पब्लिक स्कूल च्या वतीने श्रीरामचा सजीव देखावा तयार करण्यात आला होता, या मध्ये श्रीराम व शबरी भेट याचे सुंदर सादरीकरण करण्यात आले.





# विधानसभा, लोकसभा निवडणुकीसाठी कामाला लागा : अतुल भुसारी

आधुनिक केसरी न्यूज

**बुलढाणा :** संतोष वनवे तालुकाध्यक्ष रासप राष्ट्रीय समाज पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष महादेव जानकर यांच्या आदेशानुसार रासपचे अतुल भाऊ भुसारी पाटील जिल्हा संपर्कप्रमुख बुलढाणा यांच्या अध्यक्षतेत जिल्हास्तरीय कार्यकर्ता विशेष बैठक नुकतीच दि २२ जानेवारी रोजी संपन्न झाली .अशी माहिती रासप चे तालुका अध्यक्ष संतोष वनवे यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली. या जिल्हास्तरीय विशेष बैठकीला राष्ट्रीय समाज पक्षाचे बुलढाणा चे अतुल भाऊ भुसारी पाटील , रासपचे कारभारी गायकवाड विधानसभा सिंदखेडराजा प्रामुख्याने उपस्थित होते. या विशेष बैठकीला मार्गदर्शन करताना रासपचे अतुल भाऊ भुसारी पाटील म्हणाले की, आपण बुलढाणा जिल्हा कार्यकारिणी , सर्व तालुका कार्यकारणी , जिल्हा परिषद सर्कल कार्यकारिणी, पंचायत समिती सर्कल कार्यकारणी, गाव तिथे शाखा, एक बूथ पाच युथ या पद्धतीने बांधणी करून सर्व आघाड्यांची कार्यकारणी मजबूत करणार नाही तोपर्यंत या देशातील प्रस्थापित पक्ष व सर्वसामान्य जनता तुमची राजकीय दखल घेणार नाहीत . जिस समाज का दल नही उस समाज का बल नही . म्हणून रासप कार्यकर्त्यांनी सर्व ताकदीनिशी कामाला लागून पक्ष बांधणी मजबूत करून आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीत आपली राजकीय ताकद वाढवावी असे जाहीर आव्हान केले संतोष वनवे तालुकाध्यक्ष सिंदखेडराजा राष्ट्रीय समाज पक्ष अविनाश ठाकरे उमेश तायडे गौरव देशमुख गणेश झोरे प्रथमेश चित्तेकर, कार्यकर्ते उपस्थित होते.

# पीरबावडा येथे शांतता समितीची बैठक

आधुनिक केसरी न्यूज

**वडोद बाजार :** पिरबावडा येथे शांतता समीतिची बैठक व वडोद बाजार पोलीस स्टेशनला नवीन रुजू झालेले सपोनि सुनील इंगळे यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी सरपंच डॉ. सारंग गाडेकर, तंटामुक्त अध्यक्ष भगवान अण्णा गाडेकर, सोपान काळे, कलिम शेख, राजू खैरनार, क्रष्णा ढोरमारे, गजानन बोकील, निवृत्ती काळे, उमेश फलफले, वाजेद शेख, शंकर काळे, गणेश पुरी, इरफान पठाण,आलीम शहा आदी ग्रामस्थ मोठ्या संख्यने उपस्थित होते. यावेळी सरपंच श्री. सारंग गाडेकर यांनी गावातील छोटे मोठे वाद गावातच सरपंच, तंटा मुक्त समिती व पोलिसांनी मिळून सोडवण्यासाठी प्रयत्न गरजेचे असल्याचे व पोलिस स्टेशनला सहकार्य करण्याची हमी दिली यावेळी सपोनि सुनील इंगळे म्हणाले की कायदा सुव्यवस्था व गावात शांतता राहावी यासाठी गाव व पोलीस मिळून प्रयत्न आवश्यक असतात यात जर गावात अशांतता निर्माण करण्याचे काम कोणी करत असेल तर त्याला कायदेशीर पद्धतीने समजवल्या जाईल यासाठी सर्वांनी मिळून सहकार्य करणे आवश्यक आहे. यानंतर सपोनि यांचा उपस्थित ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला



गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका
(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in